दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...


## सुविचार

खरी हुशारी म्हणजे बोलण्यातली चतुराई नाही, तर योग्य वेळी योग्य निर्णय घेण्याची क्षमता, चुका मान्य करण्याचे धैर्य आणि माणुसकी जपून यश मिळवण्याची समजूत होय.

## थंडीचा जोर वाढणार.!

**पुणे:** देशभरातील काही राज्यात अचानक थंडी, तर काही राज्यात पावसाच्या सरी कोसळत आहेत. महाराष्ट्रातही तापमानात चढ-उतार पाहायला मिळत आहेत. काही भागांत पारा घसरला आहे. वर्षाच्या पहिल्याच दिवशी राज्यातील अनेक भागांत पावसाने हजेरी लावली. त्यामुळे तापमान वाढले होते. मात्र आता पुन्हा थंडीचा जोर वाढताना दिसत आहे.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | मंगळवार, दि. १३ जानेवारी, २०२६ | वर्ष - १ | अंक - १११ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### जगदीप धनखड एम्समध्ये दाखल

**नवी दिल्ली :** माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड १० जानेवारी रोजी दोनदा बेशुद्ध पडल्यानंतर सोमवारी येथील अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेत (एम्स) दाखल करण्यात आले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. ७४ वर्षीय धनखर यांचा एमआरआय करण्यात आला, असे अधिकाऱ्यांनी सांगितले आणि मंगळवारी इतर चाचण्या केल्या जातील. त्यांनी सांगितले की, माजी उपराष्ट्रपतींना १० जानेवारी रोजी पहाटे ३.३० च्या सुमारास वॉशरूममध्ये बेशुद्धीचे दोन झटके आले.

### हिमाचल प्रदेशात पावसाची शक्यता

**शिमला :** स्थानिक हवामान केंद्राने सोमवारी १६ जानेवारीपासून हिमाचल प्रदेशातील उंच टेकड्यांमध्ये पावसाळी पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली आणि बुधवारपर्यंत चंबा जिल्ह्यातील काही ठिकाणी थंडीची लाट येण्याचा पिवळा इशारा जारी केला. तसेच राज्यातील १२ पैकी सात जिल्ह्यांमध्ये - उना, बिलासपुर, हमीरपूर, कांगडा, मंडी, सोलन आणि सिरमौर - १५ जानेवारीपर्यंत दाट धुक्यासाठी पिवळा इशारा जारी केला आहे. "१५ जानेवारीपासून पश्चिम हिमालयीन प्रदेशावर नवीन पश्चिमी विक्षोभ येण्याची शक्यता असल्याने १६ ते १८ जानेवारी दरम्यान उंच टेकड्यांमध्ये काही ठिकाणी हलका पाऊस आणि बर्फवृष्टी होण्याची शक्यता आहे.

### बंगळुरू विमानतळावर प्रवाशांच्या संख्येत वाढ

**बेंगळुरू :** बंगळुरू आंतरराष्ट्रीय विमानतळावर प्रवाशांची संख्या वर्षानुवर्षे ८ टक्क्यांनी वाढून २०२५ मध्ये ४३.८२ दशलक्ष झाली, असे संबंधितांनी सोमवारी सांगितले. वाढत्या मागणीमुळे, आंतरराष्ट्रीय कनेक्टिव्हिटीचा विस्तार आणि पायाभूत सुविधांमध्ये सातत्याने गुंतवणूक झाल्याने ही वाढ झाली. २०२४ मध्ये, विमानतळावरून ४०.७३ दशलक्ष प्रवासी वाहतूक झाली.

## मुख्यमंत्री फडणवीस राज ठाकरेंवर भडकले

# यापेक्षा मुर्खपणाचे स्टेटमेंट असूच शकत नाही!

■ दैनिक राज्य लोकतंत्र





**मुंबई :** मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची रविवारी (दि. ११) मुंबईत शिवाजी पार्क मैदानात संयुक्त सभा पार पडली. या सभेत राज ठाकरे यांनी भाजपवर गंभीर आरोप केले. भाजपकडून केवळ अदानी उद्योग समूहाला विविध प्रकल्प देण्यात आल्याचा आरोप राज ठाकरे यांनी केला. तसेच आगामी काळात वाढवण बंदराजवळ विमानतळ बनवले जाईल, मुंबईचे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय विमानतळ नवी मुंबईकडे वळवण्यात येईल आणि मुंबईचे सध्याचे विमानतळ अदानी उद्योग समूहाला विकत दिले जाईल, असा आरोप राज ठाकरे यांनी केला.

त्यांच्या या आरोपांवर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्युत्तर दिले आहे. देवेंद्र फडणवीस यांनी राज ठाकरेंवर यावेळी अतिशय खोचक शब्दांत प्रत्युत्तर दिले आहे.

फडणवीस म्हणाले की, मला असे वाटते की, यापेक्षा मुर्खपणाचे दुसरे स्टेटमेंट असूच शकत नाही. मुंबईला दोन विमानतळांची गरज होती त्यामुळे दुसरे विमानतळ आम्हीच बांधले. या मुंबईचा विकास कुठल्या एका गोष्टीने थांबला असेल तर सिंगल स्ट्रिपचे एअरपोर्ट. मुंबईत इतके वर्ष ते होते, असे प्रत्युत्तर देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे. मुंबईच्या विमनतळाचा प्लॅन १९९२ पासून झाला होता. पण कोणीच काम करु शकले नव्हते. तेव्हापासून केवळ पाट्या लागल्या होत्या. मी मुख्यमंत्री झाल्यानंतर सगळ्या अडचणी दूर केल्या आणि हे विमानतळ बांधले. विमानतळ बांधले तेव्हा ते उद्योगपती अदानींचे नव्हते. याचे टेंडर जीव्हीकेला मिळाले होते. नंतर जीव्हीकेने आपले शेअर डायलूट केले आणि अदानी यांनी ते टेकओव्हर केले. आम्ही काही अदानींना दिले नव्हते. आम्ही जीव्हीकेला दिले होते. चार वर्षांनी अदानींनी तो घेतला, अशी माहिती फडणवीसांनी दिली.

त्यांना भूगोल कळत नाही. गुजरातचा तुम्ही पोर्ट बघितला तर तो चिंचोळ्या भागात आहे. तिथे विमानतळ आहे. त्या विमानतळचे ते काय करतील? याउलट वाढवण बंदराने सर्वात मोठे नुकसान गुजरातचे आहे. आजपर्यंत तिथे गुजरातचा एक पोर्ट होता. आपला सगळा माल त्या पोर्टवर यायचा. आता त्यापेक्षा दहा पटीने मोठा पोर्ट आपण केला, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

ते म्हणाले की, मला एकच समजवून सांगा. ही काय गाडी आहे का चालवत दुसरीकडे घेऊन जाता येते? पार्क करता येते? किती वेड्यासारखे हे बोलणे आहे? मला असे वाटते की, चर्चेला काहीतरी स्तर असले पाहिजे. मी पहिल्यातल्या किंवा पाचवीतल्या मुलाशी चर्चा करतोय का? त्या मुलांना कळेल अशा गोष्टी त्यांना कळत नाही, अशी खरमरीत टीका देवेंद्र फडणवीस यांनी केली.

## इराणमधील भारतीयांना सावधगिरीचा इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** इराणमध्ये सुरू असलेल्या हिंसक निदर्शनांच्या पार्श्वभूमीवर भारत सरकारने तेथील भारतीय नागरिकांना कडक सावधगिरीचा इशारा दिला आहे. परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी सोमवारी सांगितले की, इराणमधील घडामोडींवर भारत बारकाईने लक्ष ठेवून असून, भारतीय नागरिकांनी विशेषतः बाहेर पडणे टाळावे आणि अशांत परिस्थितीत अडकू नये.

जर्मनीचे चांसलर फ्रेडरिक मर्झ यांच्या पहिल्या भारत भेटीनंतर आयोजित विशेष मीडिया ब्रीफिंगमध्ये मिस्री बोलत होते. त्यांनी सांगितले की, इराणमध्ये भारतीय प्रवासी, अनिवासी भारतीय आणि विद्यार्थ्यांचा मोठा समुदाय आहे. या पार्श्वभूमीवर तेथील भारतीय दूतावासाने विद्यार्थ्यांसह सर्व नागरिकांशी संपर्क साधला असून, सध्या ते सुरक्षित असल्याची माहिती मिळाली आहे. मात्र, परिस्थिती लक्षात घेता सर्वांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असा सल्ला देण्यात आला आहे. निर्बंध आणि संपर्कातील अडथळे असूनही दूतावासाने विद्यार्थी समुदायाशी संवाद साधल्याचे मिस्री यांनी स्पष्ट केले. आतापर्यंत कोणत्याही भारतीय नागरिकाला गंभीर अडचणींचा सामना करावा लागलेला नाही. तरीही, अनावश्यक हालचाली टाळून सुरक्षित ठिकाणीच राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, इराणमध्ये देशव्यापी निदर्शनांवर करण्यात आलेल्या कारवाईत किमान ५४४ जणांचा मृत्यू झाल्याचा दावा करण्यात आला आहे. हा आकडा अधिक असण्याची शक्यताही व्यक्त होत आहे. तेथे सुरू असलेल्या निदर्शनांमध्ये १०,६०० हून अधिक लोकांना ताब्यात घेण्यात आले आहे.

## अखेर जिल्हा परिषदांच्या निवडणुका पुढे ढकलल्या

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** महापालिका निवडणुकांनंतर राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका होणार असून राज्याचं लक्ष तिकडे लागलं आहे. मात्र, निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेत निवडणुकांसाठी मुदतवाढ मिळण्याची मागणी केली होती. निवडणूक आयोगाला न्यायालयाकडून दिलासा मिळाला असून, या निवडणुकांसाठी दोन आठवड्यांची मुदतवाढ मंजूर करण्यात आली आहे. यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने ३१ जानेवारीपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे निर्देश निवडणूक आयोगाला दिले होते.

राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका घेण्यासाठी १० फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ द्या, असा अर्ज राज्य निवडणूक आयोगाकडून सर्वोच्च न्यायालयाकडे करण्यात आला होता. सर्वोच्च न्यायालयाने ३१ जानेवारी पर्यंत वेळ दिली होती. मात्र, राज्यातील १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समित्यांमध्ये ५० टक्क्यांमध्ये आरक्षण आहे. तर इतर २० जिल्हा परिषद आणि पंचायत समितीत ५० टक्के आरक्षण मर्यादा ओलांडली गेली असल्यामुळे त्याविषयी काय निर्णय होणार, यावर प्रश्नचिन्ह आहे.

दरम्यान यावर आज (१२ जानेवारी) सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. यात सर्वोच्च न्यायालयाने जिल्हा परिषद आणि पंचायत समितींच्या निवडणुका पुढे ढकलण्यास परवानगी दिली आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा खुलासा

# मुंबई महाराष्ट्राचीच, गैरअर्थ काढू नये

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** राज्यात महापालिका निवडणुकांची रणधुमाळी सुरू असताना मुंबई महापालिकेच्या प्रचारात मराठी-अमराठी मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. ठाकरे बंधू एकत्र आल्याने वातावरण तापलेले असतानाच भाजपाचे तमिळनाडूतील नेते अण्णामलाई यांच्या मुंबईविषयीच्या वक्तव्यामुळे नव्या वादाला तोंड फुटले आहे. अण्णामलाई यांनी "मुंबई महाराष्ट्राचे शहर नाही" असे विधान केल्याचा आरोप होत असून, त्यावरून राजकीय प्रतिक्रिया उमटत आहेत.

या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अण्णामलाई यांच्या वक्तव्याचा बचाव करताना गैरअर्थ काढू नये, असे स्पष्ट केले. फडणवीस म्हणाले, "अण्णामलाई हे तमिळनाडूतील नेते आहेत. ते तमिळ लोकांच्या आग्रहाखातर मुंबईत आले होते. त्यांना हिंदी नीट येत नाही आणि ते नुकतेच हिंदी बोलण्याचा प्रयत्न करू लागले आहेत. भाषेतील मर्यादेमुळे शब्दांचा घोटाळा झाला असू शकतो."

फडणवीस यांनी स्वतःचा अनुभव सांगत म्हटले की, "मी जेव्हा तमिळनाडूला सभा घ्यायला गेलो होतो, तेव्हा माझ्या तोंडून मद्रास असा शब्द निघाला होता. नंतर त्यांनी मला सांगितले आणि मी चेन्नई असा दुरुस्त उल्लेख केला. याचा अर्थ कुणाचा अपमान करायचा होता, असा होत नाही."

ते म्हणाले, "अण्णामलाई यांच्या वक्तव्यावरून जे लोक उगाच उड्या मारत आहेत, त्यांनी लक्षात ठेवावे की बॉम्बेचे 'मुंबई' नाव अधिकृतपणे करण्याची लढाई भाजपाचे नेते राम नाईक यांनी लढली. त्यासाठी आवश्यक कायदे विधानसभेत आणि संसदेत करण्यात आले. फक्त समर्थन देणारे वेगळे आणि प्रत्यक्ष लढा देणारे वेगळे असतात."

फडणवीस यांनी स्पष्ट केले की, "अण्णामलाई यांचा आशय एवढाच होता की मुंबई हे एक आंतरराष्ट्रीय शहर आहे. ते खरेही आहे. मात्र, त्याचा अर्थ मुंबई महाराष्ट्राची नाही, असा काढणे चुकीचे आहे. एखादी व्यक्ती हिंदीत बोलताना शब्द चुकले म्हणून त्याला जाणीवपूर्वक केलेले विधान मानणे योग्य नाही."

दरम्यान, प्रचारादरम्यान दिलेल्या एका मुलाखतीत अण्णामलाई म्हणाले होते की, "मुंबईच्या लोकांना ट्रिपल इंजिन सरकार हवे आहे. चेन्नई, बंगळुरू, हैदराबाद येथे वेगवेगळ्या पक्षांची सत्ता आहे. मुंबई हे एकमेव शहर आहे जिथे ट्रिपल इंजिन सरकार शक्य आहे." याच मुलाखतीत त्यांनी मुंबई हे आंतरराष्ट्रीय शहर असल्याचा उल्लेख करत महापालिकेच्या मोठ्या अर्थसंकल्पाकडे लक्ष वेधले होते. मात्र, "बॉम्बे महाराष्ट्राचे शहर नाही" या वाक्यामुळे राजकीय वाद पेटला. शिवसेना (ठाकरे गट) नेते संजय राऊत यांनी या वक्तव्यावर तीव्र टीका केली. त्यांनी पत्रकार परिषदेत म्हटले की, "मुंबई महाराष्ट्राची नाही, असे भाजपाचे स्टार प्रचारक म्हणत असतील तर त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला पाहिजे. महाराष्ट्राच्या राजधानीबाबत असे विधान करणे म्हणजे १०६ हुतात्म्यांचा अपमान आहे. मुख्यमंत्री आणि सत्ताधाऱ्यांनी यावर स्पष्ट भूमिका मांडली पाहिजे."

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबईचा मुद्दा पुन्हा केंद्रस्थानी आला आहे. अण्णामलाई यांच्या वक्तव्यामुळे राजकीय वातावरण आणखी तापण्याची चिन्हे दिसत आहेत.

## पाकच्या आसिम मुनीरची भारताला धमकी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**इस्लामाबाद :** पहलगाममधील दहशतवादी हल्ला आणि भारताच्या 'ऑपरेशन सिंदूर'नंतर पाकिस्तानने संबंध सुधारणे अपेक्षित होते. मात्र, शेजारील देश भारताच्या विरोधात सातत्याने विष ओकत आहे. पाकिस्तानचा लष्करप्रमुख फील्ड मार्शल आसिम मुनीरने पुन्हा एकदा भारताला धमकी दिली असून, मुस्लिम देशांच्या सुरक्षेच्या नावाखाली एक नवीन 'डिफेंस डॉक्ट्रिन' (संरक्षण धोरण) सादर केले आहे.

या नव्या धोरणांतर्गत पाकिस्तान मुस्लिम देशांशी आक्रमक संरक्षण आणि धोरणात्मक भागीदारी वाढवत आहे. यामध्ये शस्त्रास्त्रांचे मोठे सौदे, लढाऊ विमाने आणि क्षेपणास्त्रांची विक्री यांचा समावेश आहे. भारतीय गुप्तचर सूत्रांच्या मते, जगातील अनेक मुस्लिम देश पाकिस्तानच्या 'परमाणु छत्रछायेखाली' येण्यास उत्सुक आहेत. जगात पाकिस्तान हा एकमेव अण्वस्त्रधारी इस्लामिक देश असल्याने, ज्या देशांना इस्रायल किंवा अन्य शत्रूंचा धोका आहे, त्यांना मदत करण्याचे आश्वासन मुनीरने दिले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सौदी अरेबिया आणि पाकिस्तान यांच्यातील वाढत्या मैत्रीमुळे मध्य पूर्वेतील सत्तेचे संतुलन बिघडण्याची शक्यता आहे. पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री इशाक डार यांनी सांगितले की, जवळपास ८ मुस्लिम देश पाकिस्तानसोबत लष्करी सहकार्य करण्यास इच्छुक आहेत. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये पाकिस्तानला ८ अब्ज डॉलर्सच्या शस्त्रास्त्रांच्या ऑर्डर्स मिळाल्या असून, पुढील ५ वर्षांत हे लक्ष्य २० अब्ज डॉलर्सपर्यंत नेण्याचे त्यांचे नियोजन आहे.

आसिम मुनीरने चिथावणीखोर विधान करताना म्हटले आहे की, "येणाऱ्या काळात अर्ध्या हिंदुस्थानला घेऊन बुडू." भारताच्या संरक्षण तज्ज्ञांच्या मते, पाकिस्तान आपल्या अंतर्गत आर्थिक कमकुवतपणाला लपवण्यासाठी अशा प्रकारे बाह्य विस्तारवादावर भर देत आहे. पाकिस्तानची वाढती लष्करी पोहोच आणि मुनीरची आक्रमक विधाने भविष्यात प्रादेशिक शांततेसाठी मोठा धोका निर्माण करू शकतात.

## लाडकी बहीणचा लाभ अग्रिम स्वरुपात देण्यास मज्जाव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यात आदर्श आचारसंहिता लागू असताना 'लाडकी बहीण' योजनेचा नियमित किंवा प्रलंबित लाभ देता येईल; परंतु जानेवारी महिन्याचा लाभ अग्रिम स्वरुपात देण्यास राज्य निवडणूक आयोगाने मज्जाव केला आहे.

"लाडक्या बहिणींना मकर संक्रांतीची मोठी भेट! १४ जानेवारी पूर्वी लाडक्या बहिणींच्या खात्यात डिसेंबर व जानेवारी महिन्याचे तीन हजार जमा होणार," अशा आशयाच्या प्रसिद्ध झालेल्या बातम्यांच्या आधारे निवडणूक आयोगाकडे विविध तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यासंदर्भातील वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी लाडकी बहिण योजनेसंदर्भात शासनाने घेतलेल्या निर्णयाबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे, असे राज्य निवडणूक आयोगाने मुख्य सचिवांना कळविले होते.

"राज्य निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबर २०२५ रोजी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आदर्श आचार संहितेबाबत एकत्रित आदेश निर्गमित केले आहेत. यानुसार, निवडणूक जाहीर होण्यापूर्वी प्रत्यक्ष सुरू झालेली विकासकामे व योजना आचारसंहिता काळात सुरू ठेवण्यास परवानगी आहे," असे मुख्य सचिवांनी कळविले होते. ही पार्श्वभूमी लक्षात घेता, या योजनेचा नियमित लाभ देता येईल; परंतु अग्रिम स्वरुपात लाभ देता येणार नाही; तसेच नवीन लाभार्थीदेखील निवडता यणार नाहीत, असे निर्देश राज्य निवडणूक आयोगाने दिले आहेत.

## धनंजय मुंडे लवकरच मंत्रिमंडळात!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** माजी मंत्री आ. धनंजय मुंडे हे त्यांच्यावर झालेल्या आरोपांच्या नंतर एक वर्षापासून सरकारच्या बाहेर असून, लवकरच ते मंत्रिमंडळात पुनरागम करतील, असे सूतोवाच राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी केले आहे. एका वृत्त वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत प्रफुल्ल पटेल यांनी धनंजय मुंडे यांना सहन कराव्या लागलेल्या मनस्ताप व त्रासाबद्दल देखील वक्तव्य केले आहे.

बीड जिल्ह्यात तत्कालीन निर्माण झालेल्या परिस्थिती मध्ये जनभावनेचा विचार करून धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेतला गेला होता. त्या प्रकरणात चौकशी देखील पूर्ण झाली असून यामध्ये कुठेही धनंजय मुंडे यांचे नाव नाही, त्यांच्यावर कुठलाही आरोप नाही, तसेच कुठेही त्यांचा संबंध आढळून आलेला नाही. त्यामुळे त्यांना पुन्हा मंत्रिमंडळात सामील केले जाईल, असे त्यांनी सांगितले आहे. चार दिवसांपूर्वी प्रफुल्ल पटेल यांनी अन्य एका वृत्त वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत देखील असेच वक्तव्य केले होते.

दरम्यान, कुठल्याही चौकशीत धनंजय मुंडे यांचा कुठलाही संबंध नसून ते लवकरच मंत्री म्हणून काम करताना दिसतील असे स्पष्ट करत प्रफुल्ल पटेल यांनी सुसंकेत दिले आहेत.

काही दिवसांपूर्वीच धनंजय मुंडे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची दिल्ली येथे भेट घेतल्याने या चर्चांना सुरुवात झाली होती. नुकतेच बीड येथील एका कार्यक्रमानंतर धनंजय मुंडे आपला पुढील दौरा अचानक रद्द करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सोबत हेलिकॉप्टर मधून गेले, त्यामुळेही राज्यातील राजकारणात मोठी चर्चा झाली होती. त्यानंतर प्रफुल्ल पटेल यांनी केलेल्या वक्तव्यामुळे राजकीय घडामोडींना वेग आला असल्याचे दिसून येते.

## मोदी-मर्झ यांच्यात अहमदाबादमध्ये व्यापक चर्चा

# भारत-जर्मनी धोरणात्मक भागीदारीला नवी दिशा

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**अहमदाबाद :** पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि जर्मनीचे चांसलर फ्रेडरिक मर्झ यांच्यात सोमवारी अहमदाबादमध्ये सविस्तर चर्चा झाली. संरक्षण, तंत्रज्ञान, व्यापार, हवामान कृती आणि जागतिक सुरक्षेच्या मुद्द्यांवर दोन्ही देशांमधील सहकार्य अधिक दृढ करण्यावर या चर्चेत भर देण्यात आला. या भेटीत भारत आणि जर्मनीने आपली धोरणात्मक भागीदारी आणखी व्यापक करण्याचे स्पष्ट संकेत दिले.

दोन्ही नेत्यांनी सामायिक लोकशाही मूल्ये, नियमांवर आधारित आंतरराष्ट्रीय व्यवस्थेबाबतची वचनबद्धता आणि परस्पर आदरावर आधारित संबंध यांची पुनर्पुष्टी केली. भारत-जर्मनी धोरणात्मक भागीदारीला २५ वर्षे पूर्ण झाल्याचे आणि यंदा दोन्ही देशांमधील राजनैतिक संबंधांच्या ७५ वर्षांचा टप्पा गाठल्याचे पंतप्रधान मोदी यांनी नमूद केले. हे टप्पे केवळ कालमर्यादेचे नसून परस्पर विश्वास, सामायिक उद्दिष्टे आणि वाढत्या सहकार्याचे प्रतीक असल्याचे त्यांनी सांगितले.

आर्थिक सहकार्यावर बोलताना मोदी म्हणाले की, भारत आणि जर्मनीसारख्या अर्थव्यवस्थांमधील घनिष्ठ संबंध संपूर्ण जगासाठी महत्त्वाचे आहेत. दोन्ही देशांमधील द्विपक्षीय व्यापार ५० अब्ज अमेरिकी डॉलरच्या पुढे गेला असून, हा भारत-युरोपियन युनियन व्यापाराचा मोठा हिस्सा आहे. भारतात २ हजारांहून अधिक जर्मन कंपन्या कार्यरत असून, भारतातील संधींवर जर्मनीचा विश्वास असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

संरक्षण आणि सुरक्षेला या भागीदारीचा महत्त्वाचा आधारस्तंभ मानण्यात आले. संयुक्त लष्करी सराव, संरक्षण क्षेत्रातील सह-विकास आणि सह-उत्पादनावर लक्ष केंद्रित करणाऱ्या रोडमॅपला मान्यता देण्यात आली. भारतीय नौदल आणि हवाई दलाच्या सरावांमध्ये सहभागी होण्याच्या जर्मनीच्या इच्छेचे मोदी यांनी स्वागत केले.

या भेटीची सुरुवात सकाळी साबरमती गांधी आश्रमातून झाली. पंतप्रधान मोदी यांनी स्वतः चांसलर मर्झ यांचे स्वागत केले. दोन्ही नेत्यांनी महात्मा गांधींच्या पुतळ्याला पुष्पांजली अर्पण केली आणि हृदयकुंजला भेट दिली. त्यानंतर आंतरराष्ट्रीय पतंग महोत्सवात सहभागी होत भारत-जर्मनी मैत्रीचे प्रतीकात्मक पतंग उडवण्यात आले.

यानंतर गांधीनगर येथील महात्मा मंदिरात द्विपक्षीय बैठक झाली. व्यापार, गुंतवणूक, तंत्रज्ञान, हरित ऊर्जा आणि जागतिक घडामोडींवर चर्चा झाली.

संयुक्त पत्रकार परिषदेत मोदी यांनी ही भेट ऐतिहासिक आणि भविष्याभिमुख असल्याचे सांगितले. स्वामी विवेकानंद जयंतीच्या दिवशी ही भेट होत असल्याचा उल्लेख करत त्यांनी भारत-जर्मनी संबंधांना वैचारिक आणि सांस्कृतिक अधिष्ठान असल्याचे नमूद केले.

तंत्रज्ञान आणि हरित सहकार्यावर विशेष भर देण्यात आला. अक्षय ऊर्जा, हरित हायड्रोजन, शहरी विकास आणि गतिशीलता क्षेत्रातील संयुक्त प्रकल्प वेगाने पुढे जात असल्याचे मोदी यांनी सांगितले. भारत-जर्मनी उत्कृष्टता केंद्र स्थापनेची घोषणा करत त्यांनी ज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोन्मेषासाठी हे केंद्र महत्त्वाचे ठरेल, असे स्पष्ट केले.

## सप्तश्रृंग गड मार्गावर दोन महिने एकेरी वाहतूक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नाशिक :** साडेतीन शक्तीपीठांपैकी एक असलेल्या सप्तश्रृंग गडाकडे जाणाऱ्या नांदुरी-सप्तश्रृंग गड घाट मार्गावरील वाहतुकीत मोठे बदल करण्यात आले आहेत. या मार्गावर सुरू असलेल्या रस्ता कामामुळे पुढील सुमारे दोन महिने एकेरी वाहतुकीची अंमलबजावणी केली जाणार आहे. एका वेळी एकाच दिशेने वाहतूक सुरू राहील, तर शेवटचे वाहन पोहोचेपर्यंत विरुद्ध दिशेची वाहतूक थांबवली जाणार आहे.

नांदुरी ते सप्तश्रृंग गड हा सुमारे १० किलोमीटरचा डोंगराळ घाटमार्ग असून, येथे टप्प्याटप्प्याने काँक्रिटीकरण व संरक्षक भिंत बांधणीचे काम सुरू आहे. या मार्गाची रुंदी मर्यादित असून तीव्र वळणे, चढ-उतार आणि कमी दृश्यमानतेमुळे काम सुरू असलेल्या ठिकाणी वाहतूक वळवणे तांत्रिकदृष्ट्या शक्य नसल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कळवण उपविभागाने प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले होते.

सण-उत्सवांच्या काळात भाविकांची व वाहनांची मोठी गर्दी होत असल्याने, रस्ता काम सुरू असतानाच दोन्ही बाजूंनी वाहतूक सुरू ठेवल्यास कोंडी व अपघात होण्याची शक्यता अधिक आहे. आगामी यात्रोत्सवापूर्वी रस्त्याचे काम सुरक्षित व सुस्थितीत पूर्ण करण्यासाठी एकेरी वाहतूक व्यवस्था आवश्यक असल्याचे सहायक अभियंता रोहिणी वसावे यांनी सांगितले.

## संपादकीय

### तुम्ही मुंबईला काय दिले?

**दाक्षिणात्यांच्याविरोधात आंदोलन करून शिवसेनेची आपली पाळेमुळे मुंबईत रुजवली. आताही ठाकरे बंधू स्वतःचे अस्तित्व कायम ठेवण्यासाठी असाच प्रकार करत आहेत. म्हणूनच, इतक्या वर्षांत तुम्ही मुंबईला काय दिले, हा प्रश्न उपस्थित होतो.**

मुंबईच्या राजकारणात परप्रांतीय हा मुद्दा काही नवा नाही. बाळासाहेब ठाकरे यांनी १९६०-७० च्या दशकात दाक्षिणात्यांविरोधात आंदोलन छेडले आणि त्यानंतरच शिवसेचे राजकीय वर्चस्व प्रस्थापित झाले. त्या आंदोलनातून मराठी अस्मिता, रोजगार आणि मुंबईवरील हक्क यांचा प्रश्न ऐरणीवर आला. मात्र काळ पुढे गेला, मुंबई बदलली; दाक्षिणात्य उडुपी कमी झाले नाहीत, उलट शहराच्या अर्थव्यवस्थेत ते महत्त्वाची भूमिका बजावतात. आज मुंबईच्या कानाकोपऱ्यात असलेली उडुपी हॉटेल्स मुंबईकरांच्या जीवनात महत्त्वाचे स्थान मिळवणारी ठरली आहेत. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी म्हणून ओळखली जाते. तरीही मुंबईकरांना बाहेरच्यांची भीती दाखवण्याचे राजकारण आजही सुरू आहे. ठाकरे बंधू तामिळ, हिंदीभाषक, जैन, गुजराती अशा विविध समाजघटकांचा उल्लेख करत तोच धागा पुढे नेताना दिसतात. २५ वर्षे मुंबई महापालिकेवर सत्ता असताना तुम्ही मुंबईला काय दिले, हा प्रश्न आहेच त्याशिवाय ही भीती वास्तवातून येते आहे की राजकीय सोयीसाठी निर्माण केली जाते आहे? हाही प्रश्न. शिवाजी पार्कवरील रविवारी झालेल्या संयुक्त सभेत ठाकरे बंधूंनी पुन्हा एकदा तोच तो मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याचा डाव, मुंबईतील मराठी माणसाला एकटे पाडण्याची भीती दाखवली. मराठी माणसाची अस्मिता आणि अस्तित्व यावरच दोघांनी भाष्य केले. विशेषतः राज ठाकरे यांनी सादर केलेले व्हिडीओ प्रेझेंटेशन आणि त्यामधून उभा केलेला भीतीचा बागुलबूवा हा सभेचा केंद्रबिंदू ठरला. अशावेळी म्हणूनच तुम्ही मुंबईसाठी काय केले, हा प्रश्न उपस्थित होतो. राज ठाकरे यांनी मुंबईतून मराठी माणसाचे अस्तित्व संपविण्यासाठी पद्धतशीर प्रयत्न सुरू असल्याचा दावा केला. त्यासाठी त्यांनी अदानी समूहाला २०१४ ते २०२५ या काळात मिळालेल्या प्रकल्पांचा नकाशा, जमिनींची यादी आणि त्यामागील सरकारी निर्णयांचा गोषवारा मांडला. व्हिडीओ, पार्श्वसंगीत आणि आकडेवारी यामुळे हे सादरीकरण परिणामकारक झाले, हे मान्य करावे लागेल. शिवाजी पार्कवरील हजारोंचा जनसमुदाय अक्षरशः स्तब्धपणे ते ऐकत होता. मात्र संपादकीय दृष्टिकोनातून प्रश्न उभा राहतो तो भावनिक परिणामकारकतेचा नव्हे, तर राजकीय आशयाचा. राज ठाकरे यांनी मांडलेली मुंबई हस्तगत करण्याची योजना ही संकल्पना अनेक स्तरांवर तपासण्याची गरज आहे. वाढवण बंदर, नवी मुंबई विमानतळ, बुलेट ट्रेन, एमएमआर क्षेत्रावरचा सरकारी फोकस हे सर्व स्वतंत्रपणे पाहिले तर पायाभूत सुविधा या विकासाचा भाग आहेत. मात्र, या सगळ्याला एकत्र बांधून मुंबई बाहेरच्यांच्या घशात घालण्याचा डाव असा निष्कर्ष काढला जातो, तेव्हा तो अतिरंजित ठरतो. विकासाच्या निर्णयांमागे कॉर्पोरेट हितसंबंध असू शकतात, त्यावर प्रश्न विचारणे आवश्यक आहे; पण त्यातून थेट भाषिक-प्रादेशिक भीती निर्माण करणे हा राजकीय मार्ग सोपा ठरतो. तुमची सत्ता असताना, तुम्ही मुंबईला काय दिले, असे म्हणून विचारावे लागते. मुंबई विमानतळाची जागा, धारावी पुनर्विकास, कलिना परिसर या सगळ्या मुद्द्यांवर पारदर्शकता, सार्वजनिक हित आणि स्थानिकांच्या हक्कांबाबत चर्चा होणे गरजेचे आहे. मात्र ती चर्चा मराठी विरुद्ध अमराठी या चौकटीत अडकली, तर मूळ प्रश्न बाजूला पडतो. बाळासाहेबांच्या काळात अस्मितेचा मुद्दा हा संघटनेसाठी वापरला गेला; आज मात्र मुंबई ही बहुभाषिक, बहुसांस्कृतिक वास्तव स्वीकारूनच पुढे जाणार आहे. तिला मागे नेणारे राजकारण किती काळ चालेल, हा प्रश्न आहेच. भाजपच्या आक्रमक प्रचाराला उत्तर देण्यासाठी ठाकरे बंधूंनी एकत्र येऊन भावनिक मुद्दे उभे केले, हे राजकीय गणित असू शकते. पण मुंबईकर मतदार आता केवळ या भीतीने मतदान करेल, असे गृहित धरणे ठाकरे बंधूंच्या अस्तित्वाला धोकादायक ठरू शकते. रोजगार, घरबांधणी, वाहतूक, पर्यावरण आणि प्रशासनाची कार्यक्षमता या प्रश्नांची ठोस उत्तरे देणारे राजकारणच टिकणार आहे. सामान्य मुंबईकर म्हणूनच प्रश्न विचारतो आहे की, तुम्ही मुंबईला काय दिले आणि त्याचे उत्तर ठाकरेंना द्यावेच लागणार आहे.

# वाढीचे आकडे आणि प्रत्यक्षातले वास्तव

देशाच्या आर्थिक वाटचालीचे चित्र सध्या जीडीपीच्या उच्च वाढीच्या आकड्यांतून रंगवले जात आहे. भारत जगातील सर्वाधिक वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक असल्याचे सांगितले जाते. आंतरराष्ट्रीय पातळीवरही हे आकडे आशादायक मानले जात आहेत. मात्र अर्थव्यवस्था समजून घेताना केवळ वाढीचा दर पुरेसा नसतो. त्या वाढीचा पाया मजबूत आहे का आणि तिचा लाभ समाजातील किती घटकांपर्यंत पोहोचतो, हे अधिक महत्त्वाचे ठरते. अलीकडील आकडेवारीत वास्तविक आणि नाममात्र जीडीपी वाढ यांतील फरक प्रकर्षाने जाणवतो. वास्तविक वाढ जास्त आणि नाममात्र वाढ तुलनेने कमी असल्याने आकडे कसे मोजले जात आहेत, याबाबत प्रश्न उपस्थित होतात. महागाईचा परिणाम समायोजित करताना वापरल्या जाणाऱ्या निर्देशांकांमुळे वाढीचे चित्र अधिक उजळून दाखवले जात नाही ना, अशी शंका काही अर्थतज्ज्ञ व्यक्त करतात. प्रत्यक्ष व्यवहारात उत्पन्न, नफा आणि खप यांचा वेग जर मर्यादित असेल, तर कागदावरील वाढ सामान्य माणसाच्या अनुभवाशी विसंगत ठरते. सध्याच्या वाढीचा मोठा आधार सरकारी खर्चावर दिसतो. पायाभूत सुविधांवरील गुंतवणूक, मोठे प्रकल्प आणि सार्वजनिक क्षेत्रातील खर्चामुळे अर्थव्यवस्थेला चालना मिळत आहे. रस्ते, रेल्वे, बंदरे आणि विमानतळांसारख्या प्रकल्पांचा परिणाम आकड्यांत उमटतो. मात्र खाजगी क्षेत्रातील गुंतवणूक अपेक्षेइतकी वेगवान नाही. उद्योगांकडून नवीन प्रकल्पांमध्ये गुंतवणूक, उत्पादनक्षमता वाढवणे आणि दीर्घकालीन नियोजन याबाबत अजूनही सावध भूमिका घेतली जात आहे.

खाजगी गुंतवणूक मंदावलेली असण्याचा सर्वात मोठा परिणाम रोजगारनिर्मितीवर दिसतो.

**देशाची अर्थव्यवस्था वेगाने वाढते आहे, असे सांगणारे जीडीपीचे आकडे सध्या मोठ्या अभिमानाने मांडले जात आहेत. आकड्यांमागील आर्थिक वास्तव, रोजगाराची स्थिती आणि सामान्य नागरिकाच्या जीवनातील बदल पाहता ही वाढ किती ठोस आहे, याचा विचार करणे आवश्यक ठरते.**




जीडीपी वाढीचे आकडे जितके आशादायक वाटतात, तितकी रोजगाराची स्थिती समाधानकारक नाही. तरुणांसाठी स्थिर नोकऱ्या, नियमित उत्पन्न आणि सुरक्षित कामाच्या संधी वाढत नसल्याची भावना सर्वत्र आहे. असंघटित क्षेत्रातील कामगारांचे उत्पन्न अजूनही अनिश्चित असून महागाईच्या तुलनेत त्यांची क्रयशक्ती फारशी वाढलेली नाही.

निर्यात क्षेत्राकडूनही अपेक्षित आधार मिळताना दिसत नाही. जागतिक अर्थव्यवस्थेतील अनिश्चितता, व्यापारातील अडथळे आणि संरक्षणवादी धोरणांचा परिणाम भारतीय निर्यातीवर होत आहे. काही विशिष्ट क्षेत्रांत प्रगती झाली असली, तरी एकूण निर्यातीचा वेग अर्थव्यवस्थेच्या वाढीशी सुसंगत नाही. देशांतर्गत मागणीवरच मोठ्या प्रमाणात अवलंबून असलेली वाढ दीर्घकाळ टिकेल का, हा प्रश्न त्यामुळे पुढे येतो. आकडेवारीच्या विश्वासार्हतेचा मुद्दा देखील दुर्लक्षित करता येत नाही. जीडीपीच्या आकड्यांमध्ये वारंवार मोठ्या प्रमाणावर दुरुस्त्या केल्या जातात. आधी जाहीर झालेले अंदाज नंतर लक्षणीयरीत्या बदलल्याने संभ्रम निर्माण होतो. जीडीपी हा धोरणनिर्मितीचा पाया असल्याने त्यातील अनिश्चितता अर्थसंकल्प, गुंतवणूक निर्णय आणि आर्थिक नियोजनावर परिणाम करू शकते.

याचा अर्थ असा नाही की भारतीय अर्थव्यवस्था अडचणीत आहे किंवा वाढ पूर्णपणे भासमय आहे. मात्र ही वाढ किती टिकाऊ आहे आणि ती सर्वसामान्यांपर्यंत किती प्रमाणात पोहोचते, हा खरा मुद्दा आहे. मजबूत आर्थिक वाढ म्हणजे केवळ आकड्यांची झेप नव्हे, तर रोजगार, उत्पन्न आणि जीवनमानातील ठोस सुधारणा होय. पुढील काळात आर्थिक धोरणांचा भर वाढीच्या गुणवत्तेवर असणे आवश्यक आहे. गुंतवणुकीसाठी अनुकूल वातावरण निर्माण करणे, लघु व मध्यम उद्योगांना बळ देणे, निर्यात वाढवणे आणि रोजगारनिर्मितीला प्राधान्य देणे गरजेचे आहे. आर्थिक आकडेवारी पारदर्शक आणि विश्वासार्ह असणेही महत्त्वाचे आहे.

जीडीपी वाढ ही दिशादर्शक असू शकते. आकड्यांच्या पलीकडे जाऊन अर्थव्यवस्थेचा परिणाम सामान्य नागरिकाच्या आयुष्यात किती जाणवतो, हे पाहणे आवश्यक आहे. वाढीचा गजर जितका मोठा, तितकी वास्तवाची तपासणी अधिक काटेकोर असली पाहिजे, हेच या आकड्यांमधून अधोरेखित होते.

# पिंपरी-चिंचवडमध्ये प्रचारात आय लव्ह यू

## अजित दादांच्या सभेत कार्यकर्त्याने दिला आवाज; दादांचे खास शैलीत उत्तर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** राज्यातील महापालिका निवडणुकांमध्ये मुंबईनंतर पुणे महापालिकेकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. कारण सत्तेत एकत्र असलेले भाजप आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये येथे थेट सामना रंगला आहे. गेल्या काही दिवसांपासून या निवडणुकीवरून राजकीय वातावरण चांगलेच तापले असून आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडताना दिसत आहेत.

प्रचाराचा शेवटचा रविवार असताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पिंपरी चिंचवड येथील प्रभाग क्रमांक २ मध्ये प्रचारसभा घेतली. या सभेदरम्यान एक मजेशीर प्रसंग घडला. अजित पवार भाषण करत असताना एका कार्यकर्त्याने थेट अजित दादा, आय लव्ह यू अशी हाक मारली. यावर अजित पवार यांनीही आपल्या खास शैलीत उत्तर देत उपस्थितांना हसवले.

अजित पवार म्हणाले, घड्याळाचं बटण दाब, ते आय लव्ह यू बाजूला ठेव. घरी जाऊन बायकोला म्हण लव्ह यू, लव्ह यू तेव्हा बायको म्हणेल आज जास्तच बिघडलाय. त्यांच्या या




मिश्किल उत्तरावर सभेत एकच हशा पिकला.

सभेत बोलताना अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या विकासाच्या योजना मांडल्या. पुणेकरांसाठी मोफत मेट्रो आणि मोफत बस सेवेचे आश्वासन देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. यामुळे प्रदूषण कमी होईल आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळेल, असेही ते म्हणाले. विरोधक ७५ वर्षांनंतर पीएमपीएल मोफत देण्याचे बोलत आहेत, मात्र कशाला ७५ वयापर्यंत वाट पाहायची, आम्ही जन्मापासूनच मोफत सेवा देतोय, असा टोला त्यांनी लगावला.

पिंपरी चिंचवडमध्ये दोन्ही राष्ट्रवादी पक्षांनी युती केल्याबाबत बोलताना अजित पवार म्हणाले की, अनेक नागरिकांचे म्हणणे होते की आम्ही तुम्हालाही मानतो आणि मोठ्या साहेबांनाही मानतो, त्यामुळे युती केली. ही युती मतदारांना आवडली असून यामुळे मतांची विभागणी होणार नाही आणि शहराचा सर्वांगीण विकास होईल.

पुण्यातील वाहतूक कोंडी आणि खराब रस्त्यांमुळे दररोज साडे सात कोटी रुपये पेट्रोलवर वाया जात असल्याचे सांगत अजित पवार यांनी हेच पैसे मेट्रो प्रवासासाठी वापरण्याचा मोठा प्लॅन मांडला. राष्ट्रवादीच्या उमेदवारांना निवडून देण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

# पिंपरी-चिंचवडचा विकास हाच पक्षाचा अजेंडा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** निवडणुकीचा प्रचार जोरात सुरू असून आता काहीच दिवस उरले आहेत. प्रत्येक प्रभागातील पक्ष निरीक्षकांशी प्रचाराबाबत बैठका घेण्यात आल्या आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पिंपरी-चिंचवड शहराच्या जडणघडणीत मनापासून सहभाग घेतला असून विकास हाच पक्षाचा एकमेव अजेंडा आहे, असे प्रतिपादन खासदार सुनेत्रा पवार यांनी केले.

पिंपरी-चिंचवडमधील विविध प्रभागांतील पक्ष निरीक्षकांची खासदार सुनेत्रा पवार यांनी भेट घेऊन प्रचाराचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी माजी आमदार विलास लांडे यांच्या घरी सदिच्छा भेटही दिली. त्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना त्या म्हणाल्या की, अजित पवार यांनी या शहराशी नेहमीच आत्मीयतेचे नाते जपले आहे. त्यांनी दिलेला वेळ, मांडलेला विचार आणि स्पष्ट व्हिजन यांच्या बळावर शहराचा सर्वांगीण विकास घडवून आणला.

"मुलांप्रमाणे शहरावर प्रेम करत त्यांनी प्रत्येक घटकाचा विचार करून विकासकामे राबवली. काही लोक स्वतः मोठे होण्यासाठी टीका करतात; मात्र अशा टीकेकडे दुर्लक्ष करत अजित पवार नेहमी विकासाचा मुद्दा केंद्रस्थानी ठेवत पुढे गेले. त्यामुळेच शहराला नवे चैतन्य मिळाले आहे," असेही सुनेत्रा पवार म्हणाल्या. आगामी काळातही विकास हाच एकमेव मुद्दा राहणार असून अन्य विषयांकडे लक्ष दिले जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. पिंपरी-चिंचवड महापालिकेसह राज्यातील विविध महापालिकांमध्ये वेगवेगळ्या पद्धतीने आघाडी आणि युती होत असल्याचे नमूद करत, पिंपरी-चिंचवडमध्येही त्याच धर्तीवर युती झाली असल्याचे त्यांनी सांगितले. इतर राजकीय बाबी वरिष्ठ पातळीवर ठरवण्यात आल्या असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या विकासदृष्टीपत्रामुळे आगामी महापालिका निवडणुकीत पिंपरी-चिंचवडमध्ये राजकीय वातावरण अधिक तापण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

दरम्यान, अजित पवार आणि खासदार सुप्रिया सुळे यांना एकाच व्यासपीठावर पाहण्याचा आनंद झाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. "आम्ही कुटुंब म्हणून नेहमी एकत्र आहोत," असे सांगत त्यांनी राजकीय चर्चांवर पूर्णविराम देण्याचा प्रयत्न केला.

# राजकीय व्यवस्थापन संस्थांवर वाढता भर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** महापालिकेच्या आगामी निवडणुकीत प्रस्थापित नगरसेवकांसह अनेक नवे उमेदवारही निवडणूक रिंगणात उतरत असून आपले नशीब आजमावत आहेत. यंदा निवडणूक पॅनेल पद्धतीने होणार असल्याने प्रचार आणि नियोजन अधिक काटेकोर करण्यावर भर दिला जात आहे. त्यामुळे अनेक उमेदवारांनी निवडणूक व्यवस्थापनासाठी खास राजकीय व्यवस्थापन संस्थांची मदत घेण्यास सुरुवात केली आहे.

या व्यवस्थापन संस्थांकडून नव्या उमेदवारांसह प्रस्थापित नगरसेवकांनाही प्रभागातील मतदारांचा बदलता कल, प्रभावी प्रचार साहित्य तसेच प्रशिक्षित कार्यकर्ते उपलब्ध करून दिले जात आहेत. महापालिका निवडणुकीसाठी नव्याने आरक्षणाची सोडत निघाल्यामुळे काही उमेदवारांनी पत्नी, मुलगी किंवा सून अशा घरातील महिलांना उमेदवारी दिली आहे. अनेक नेतेमंडळी वेगवेगळ्या पक्षांत गेल्याने स्थानिक राजकीय समीकरणांमध्ये मोठा बदल झाला आहे. त्यामुळे लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांप्रमाणेच यंदाच्या महापालिका निवडणुकीतही काही उमेदवारांनी व्यावसायिक राजकीय व्यवस्थापन संस्थांची नियुक्ती केली आहे. या संस्था प्रत्यक्ष डोअर-टू-डोअर सर्वेक्षण करून नागरिकांशी संवाद साधतात. त्यानंतर सर्व माहिती एका विशेष सॉफ्टवेअर किंवा ॲपमध्ये संकलित केली जाते. मतदारांचे नाव, वय, पत्ता, जात, प्रांतनिहाय माहिती यासह त्यांचा राजकीय कलही या डेटामध्ये नोंदवला जातो. ही सगळी माहिती उमेदवार आणि नगरसेवकांना मोबाईलवर एका क्लिकवर उपलब्ध होत असल्याने प्रचार अधिक नियोजित आणि लक्ष्यित पद्धतीने करता येत आहे.

# फडणवीस गृहमंत्री आहेत हे विसरू नका: आमदार लांडगे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवडमधील एसआरए प्रकल्पावरून सध्या जोरदार वाद सुरू आहे. या पार्श्वभूमीवर आमदार महेश लांडगे यांनी एका विरोधी नेत्यावर चांगलाच हल्ला चढवला. देवेंद्र फडणवीस मंचावर असतानाच लांडगे म्हणाले, "एक नेता स्वतःला एसआरएचा बाप समजतोय. आता त्याला त्याची जागा दाखवायची वेळ आली आहे."

लांडगे यांनी आरोप केला की, एसआरए प्रकल्पातील नागरिकांना मतदान न केल्यास धमकावलं जात



आहे. "मी सांगतो तेच घर घ्यायचं, नाहीतर अडचण होईल, असा माज काही जण दाखवत आहेत. प्राधिकरण भागात आम्ही एसआरए प्रकल्प सुरू केला, तेच काही लोकांना खुपतंय," असंही त्यांनी स्पष्ट केलं. यावर तात्काळ प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी ठाम शब्दांत इशारा दिला. "हे कायद्याचं राज्य आहे. इथं धमक्यांचं राजकारण चालणार नाही. कुणी धमक्या देत असेल, तर पोलीस त्याला योग्य ती जागा दाखवतील. मी गृहमंत्री असताना अशी हिंमत कुणाची कशी होते?" असा सवाल त्यांनी केला.

फडणवीस म्हणाले की, "एसआरएमध्ये जर कुणी नागरिकांना धमकावत असेल, तर घाबरण्याचं कारण नाही. पोलीस यंत्रणा सक्षम आहे. मला वैयक्तिक हस्तक्षेप करण्याची गरज भासणार नाही." तसेच त्यांनी सांगितलं की, "मुख्य एसआरए संस्थेचा अध्यक्ष मी स्वतः आहे. त्यामुळे नागरिकांनी निर्धास्त राहावं. जनहिताच्या विरोधात कुणी काम करत असेल, तर १६ जानेवारीनंतर योग्य ती कारवाई केली जाईल."

दरम्यान, फडणवीसांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर नाव न घेता टोला लगावला. "निवडणुका जवळ आल्या की काही लोकांचा अचानक आवाज मोठा होतो. आमचं काम बोलतं. जनतेसमोर काम ठेवलं की समोरच्यांकडे उत्तर राहत नाही. काहींना फक्त वाद घालून निवडणूक लढवायची आहे," असंही ते म्हणाले.

# मकर संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठांत खरेदीची लगबग

## तिळगूळासह हलव्यांच्या दागिन्यांनी बाजारपेठा सजल्या; वाणाच्या खरेदीलाही मिळतेय प्राधान्य

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** 'तिळगूळ घ्या, गोड गोड बोला' या संदेशातून आपुलकी आणि स्नेह वाढवणारा मकर संक्रांतीचा सण अवघ्या दोन दिवसांवर येऊन ठेपला आहे. सूर्य मकर राशीत प्रवेश करतो, त्या दिवशी साजरी होणारी ही वर्षातील पहिली संक्रांत असल्याने शहरातील बाजारपेठांमध्ये खरेदीसाठी मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. तिळगूळ, लाडू, हलवा, हलव्याचे दागिने, पतंग, सजावटीचे साहित्य तसेच वाणासाठी लागणाऱ्या विविध वस्तूंनी बाजार सजले आहेत.



संक्रांतीनंतर येणाऱ्या किंक्रांतीपासून रथसप्तमीपर्यंत लहान मुलांना बोरन्हाण घालण्याची परंपरा आहे. हिवाळ्यात उपलब्ध होणाऱ्या भाज्या, फळे आणि धान्यांचे सेवन व्हावे, या उद्देशाने ही पद्धत रूढ झाली आहे. यासाठी लागणारे साहित्य खरेदी करण्यासाठी बाजारात मोठी वर्दळ दिसून येत आहे. बोरन्हाणासाठी बोरे, ऊस यासह विविध बिस्किटे, चॉकलेट यांचीही मोठ्या प्रमाणावर खरेदी होत आहे.

बोरन्हाणाच्या सजावटीसाठी विविध प्रकारचे साहित्य बाजारात दाखल झाले आहे. बोरन्हाणाचे कटआऊट, पतंग, कृष्ण-राधा प्रतिमांचे पतंगांचे हार, फुलांच्या माळा यांना विशेष मागणी आहे. पतंगांच्या माळा पन्नास रुपयांपासून उपलब्ध असून पुठ्ठ्याच्या कटआऊटची किंमत शंभर रुपयांपासून पुढे आहे. या रंगीबेरंगी साहित्यामुळे बाजारपेठा अधिकच खुलून दिसत आहेत.

लहान मुलांसाठी हलव्याचे दागिने हा बोरन्हाणाचा खास भाग असतो. मुलांसाठी कृष्ण सेट तर मुलींसाठी राधा सेट असे प्रकार मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहेत. त्याचबरोबर नवविवाहित महिलांसाठी गुलाब सेट, मोगरा सेट, वेलवेट सेट, मेखला सेट, राणीहार अशा विविध प्रकारच्या हलव्याच्या दागिन्यांची खरेदी वाढली आहे. या दागिन्यांच्या किमती ३५० रुपयांपासून ते दोन हजार रुपयांपर्यंत आहेत.

अलीकडच्या काळात 'कस्टमाइज' हलव्याचे दागिने तयार करून घेण्याकडे महिलांचा कल वाढला आहे. त्यामुळे घाऊक बाजारातून खास दागिन्यांसाठी हलवा खरेदी केला जात आहे. बांगड्या, झुमके, राणीहार, मेखला, बाजूबंद यांसारख्या दागिन्यांना विशेष मागणी आहे. हे दागिने तयार करण्यासाठी वेळ लागत असल्याने आठ ते दहा दिवस आधीच ऑर्डर दिली जात असल्याची माहिती विक्रेत्यांनी दिली.

मकर संक्रांतीच्या दिवशी सुगड पूजा करून विविध भाज्या आणि फळांचे अर्पण केले जाते. त्यानंतर महिलांकडून विडे घेणे, हळदी-कुंकू करणे आणि वाण देण्याची परंपरा आहे. संक्रांतीपासून रथसप्तमीपर्यंत चालणाऱ्या या कार्यक्रमांसाठी वाण खरेदीला वेग आला आहे. त्यामुळे महिलांची बाजारात मोठी गर्दी दिसून येत आहे.

रविवार आणि संक्रांतीच्या तोंडावर आलेली सुट्टी यामुळे पिंपरी, चिंचवड, आकुर्डी या मध्यवर्ती भागांसह उपनगरांतील सर्वच बाजारपेठांमध्ये खरेदीसाठी गर्दी झाली होती. घरगुती वापराच्या वस्तूंसोबतच फ्रीज मॅग्नेट, मसाले, पर्स, शोभेचे दिवे, इमिटेशन दागिने, तयार रांगोळी आणि पूजेच्या थाळ्यांची मोठ्या प्रमाणावर खरेदी होत आहे. याशिवाय ऑनलाइन माध्यमातूनही वाण खरेदी करण्याकडे महिलांचा कल वाढताना दिसत आहे.

# संत तुकाराम महाराज जन्मोत्सव सोहळ्याची तयारी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**देहू :** संत तुकाराम महाराज यांचा जन्मोत्सव सोहळा येत्या १७ ते २३ जानेवारीदरम्यान येथील संत तुकाराम महाराज वैकुंठ स्थान मंदिर परिसरात साजरा करण्यात येणार आहे. या सोहळ्यानिमित्त मंडप उभारणी व वासा पूजनाचा कार्यक्रम रविवारी पार पडला.

या वेळी संत तुकाराम महाराज संस्थानचे अध्यक्ष जालिंदर महाराज मोरे, विश्वस्त उमेश महाराज मोरे, दिलीप महाराज मोरे, विक्रमसिंह महाराज मोरे, वैभव महाराज मोरे, गणेश महाराज मोरे, लक्ष्मण महाराज मोरे यांच्यासह भाविक उपस्थित होते. माघ शुद्ध पंचमी अर्थात वसंत पंचमीच्या दिवशी, २३ जानेवारी रोजी संत तुकाराम महाराज यांचा जन्मदिवस साजरा केला जातो. त्या पार्श्वभूमीवर संत तुकाराम महाराज संस्थान आणि संत तुकाराम महाराज जन्मोत्सव सोहळा समितीच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवाची सुरुवात शनिवारी (ता. १७) सायंकाळी ७ ते ९ या वेळेत संस्थानचे माजी अध्यक्ष पुरुषोत्तम महाराज मोरे यांच्या कीर्तनाने होणार आहे. रविवारी (ता. १८) बुलडाणा येथील पुरुषोत्तम महाराज पाटील यांचे कीर्तन होईल. सोमवारी (ता. १९) माऊली पठाडे, मंगळवारी (ता. २०) प्रमोद महाराज जगताप, बुधवारी (ता. २१) सुदाम महाराज पानेगावकर, तर गुरुवारी (ता. २२) शेखर महाराज जांभूळकर यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले आहे. शुक्रवारी (ता. २३) संत तुकाराम महाराज जन्मदिनी सकाळी १० ते १२ या वेळेत कीर्तनकार जयवंत महाराज बोधले यांचे विशेष कीर्तन होणार आहे, अशी माहिती संस्थानाने दिली आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### भरधाव वाहनाने महिला सफाई कर्मचाऱ्यास उडवले

**चाकण :** नेहमीप्रमाणे पहाटे चार वाजता चाकण शहरात साफसफाई चे काम करण्यासाठी निघालेल्या चाकण पालिकेच्या कर्मचारी महिलेला पुणे नाशिक महामार्गावर चौधरी ढाब्याच्या समोर सकाळी सहाच्या सुमारास साफसफाईचे काम करत असताना अज्ञात मोटार चालकाने जोरदार धडक दिली. यामध्ये सफाई कामगार महिला गंभीर जखमी झाली आहे. बेबीताई अनिल चव्हाण (वय ४०, वर्ष रा. आगरवाडी चाकण ता. खेड मूळ रा. कराड सातारा) असे जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे.

### महामार्गावर अनोळखी इसमाचा मृत्यू

**चाकण :** पुणे नाशिक महामार्गावर संतोष नगर भाम येथे अंदाजे ३५ वर्षीय व्यक्ती बेशुद्ध अवस्थेत सकाळी दहाच्या सुमारास आढळून आला. त्यास ॲम्बुलन्समधून चाकण ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी आणले असता तो मयत झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. या अनोळखी व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नाही. पिंपरी चिंचवड यशवंतराव चव्हाण रुग्णालयात संबंधित मयत इसमाचे शव तीन दिवस शवागृहात ठेवण्यात येणार आहे. याबाबत चाकण पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

### स्कॉर्पिओच्या धडकेत दुचाकीस्वार गंभीर जखमी

**चाकण :** रात्रीच्या वेळी आळंदी फाटा येथून आंबेठाण रोड रस्त्याने निघालेल्या दुचाकीस्वारास स्कॉर्पिओ वाहनाने जोरदार धडक दिली. यामध्ये दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला. अपघातानंतर स्कॉर्पिओ मोटर गाडी चालक तसाच पुढे पसार झाला. अपघातग्रस्त दुचाकीस्वारास रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याप्रकरणी जखमी भरत लांडगे (वय ५४, रा. आंबेठाण रोड, भीमाशंकर कॉलनी जवळ) यांनी चाकण पोलीस ठाण्यात दिली आहे.

---

## मनोहर सांडभोर नूतन उपनगराध्यक्ष

# राजगुरुनगरच्या नगराध्यक्षांनी पदभार स्वीकारला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**खेड :** राजगुरुनगर नगरपरिषदेत शिंदे गटाच्या शिवसेनेचे मंगेश गुंडाळ यांनी उत्साहात नगराध्यक्षपद स्वीकारले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला नगरपरिषदेत मोठा विजय मिळाल्यामुळे पदग्रहण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात सर्वपक्षीय नगरसेवक, नागरिक आणि स्थानिक नेत्यांचीही उपस्थिती होती.




नगरपरिषद निवडणुकीचे निकाल २ डिसेंबर २०२५ रोजी झालेल्या मतदानानंतर २१ डिसेंबरला जाहीर झाले. नगरपरिषदेत एकूण १० नगरसेवक निवडून आले, त्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे ५, भाजपचे ४ आणि २ अपक्ष नगरसेवक बिनविरोध होते. मंगेश वसंतराव गुंडाळ यांची नगराध्यक्षपदी मोठ्या मताधिक्याने निवड झाली, तर उपनगराध्यक्षपदी मनोहर सांडभोर यांची बिनविरोध निवड झाली. सोमवारी (दि. १२) पदग्रहण सोहळ्यात मुख्याधिकारी अंबादास गरकळ यांनी नवीन पदाधिकाऱ्यांचे स्वागत केले. नगरपरिषद प्रवेशद्वार सजवण्यासाठी रांगोळी, फुलांच्या माळा आणि पायघड्या लावण्यात आल्या होत्या. सकाळी नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ यांनी पदभार स्वीकारला, तर दुपारी साडेबार वाजता उपनगराध्यक्ष मनोहर सांडभोर यांची निवड जाहीर करण्यात आली. शिंदे गटाकडून सचिन मधवे आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटातून सागर सातकर यांची नगरसेवक पदासाठी निवड झाली.

पदभार स्वीकारल्यानंतर नगराध्यक्ष गुंडाळ व उपनगराध्यक्ष सांडभोर यांच्या समर्थकांनी शहरात गुलाल उधळून आणि डीजेच्या तालावर मिरवणुका काढल्या. कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष, माजी पंचायत समिती सभापती भगवान पोखरकर, माजी जिल्हा परिषद सदस्य अतुल देशमुख, सचिन लांडगे, नगरसेवक वैभव घुमटकर, निलेश घुमटकर तसेच सर्वपक्षीय नगरसेवक उपस्थित होते.

अतुल देशमुख यांनी सांगितले की, पदभार स्वीकारण्यापूर्वीच नगराध्यक्ष गुंडाळ व त्यांच्या सहकाऱ्यांनी शहराचा पाणी पुरवठा सुरू केला असून इतर विकासकामांमध्येही तत्परता दाखवली जाईल. भगवान पोखरकर यांनी तालुक्यातील राजगुरुनगर आणि चाकण नगरपरिषदेत शिंदे सेनेची निर्विवाद सत्ता स्थापनेबाबत मतदारांचे आभार मानले. त्यांनी जाहीर केले की, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीतही पक्ष स्वबळावर लढणार आहे.

या निकालातून पुणे जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये शिंदे गटाच्या शिवसेनेला मजबूत पाठिंबा मिळाल्याचे दिसून आले असून, राजगुरुनगरच्या विकासासाठी नव्या पदाधिकाऱ्यांकडून शहरवासी मोठ्या अपेक्षेत आहेत. नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ यांनी सांगितले की, २६ जानेवारी २०२६ पासून शहराला रोज स्वच्छ पाणी पुरवठा सुरू होईल. वाडा रस्ता आणि न्यायालयालगतच्या रस्त्यावरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी नवीन पार्किंग व्यवस्था लागू केली जाईल. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली कचरा प्रकल्प आणि एसटीपी प्लांटसाठी प्राधान्याने जागा व निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. सर्वपक्षीय नगरसेवकांसह शहराचा सर्वांगीण विकास साधला जाईल, असे मंगेश गुंडाळ यांनी स्पष्ट केले.

---

## वालवडच्या बाजारभावात घसरण शेतकऱ्यांसमोर दुहेरी संकट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात वालवडीचे पीक मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. मात्र यंदा या पिकाला दुहेरी संकटाचा सामना करावा लागत असून बाजारात सध्या अपेक्षित दर मिळत नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. त्यातच मध्यंतरी निर्माण झालेल्या ढगाळ हवामानामुळे वालवडीच्या पिकावर प्रतिकूल परिणाम झाला असून मावा रोगाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे.

गेल्या काही दिवसांपासून वातावरणात सातत्याने बदल होत असून सकाळी कडाक्याची थंडी, दुपारी उष्णता तर संध्याकाळी ढगाळ वातावरण अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. या हवामान बदलाचा थेट परिणाम वालवडीच्या पिकावर झाला. मावा रोग झपाट्याने पसरल्याने पानांचा रंग बदलणे, वाढ खुंटणे तसेच उत्पादनात घट होण्याची चिन्हे दिसून येत आहेत. अनेक शेतकऱ्यांना वारंवार औषध फवारणी करावी लागत असून त्याचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे.

दुसरीकडे, बाजारात वालवडीला अपेक्षेप्रमाणे भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांची कसरत वाढली आहे. तीन महिन्यांपूर्वी वालवडीला दहा किलोला साडेसहाशे रुपये बाजारभाव मिळत होता. परंतू त्यात आता मोठी घसरण झाली आहे. सध्या दहा किलोला २०० ते २५० रुपये बाजारभाव मिळत आहे. उत्पादन खर्चाच्या तुलनेत मिळणारा हा दर अत्यल्प असल्याने मजुरी, औषधे, खते आदींचा खर्चही निघत नाही. मजुरीचे दर वाढले असून शेतमजुरांची उपलब्धताही मर्यादित असल्याने शेतकऱ्यांना दुहेरी खर्च सहन करावा लागत आहे. चांगला भाव मिळत असल्याने अनेक शेतकऱ्यांनी पिक मोठ्या प्रमाणावर घेतले. मात्र हवामानातील बदल, रोगांचा प्रादुर्भाव आणि घसरलेले दर यामुळे अपेक्षित उत्पन्न मिळण्याची शक्यता धूसर झाली आहे. काही शेतकऱ्यांनी वालवडीच्या बागाही काढून टाकल्या आहेत.

---

## जुन्नर उपनगराध्यक्षपदी कोणाची वर्णी?

### शिवसेनेला यश मिळेल असा अंदाज; आज निवड

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जुन्नर :** आमदार शरद सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली जुन्नर नगरपरिषदेच्या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये शिवसेनेच्या सुजाता मधुकर काजळे या प्रथम लोकनियुक्त महिला नगराध्यक्षा म्हणून निवडून आल्या व त्यांनी नुकतीच नगराध्यक्ष पदाची सूत्रे स्वीकारली. आता नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्ष पदी कुणाची वर्णी लागणार याकडे शहरातील जनतेचे लक्ष लागले आहे. दरम्यान, पक्षीय बलाबल पाहता उपनगराध्यक्ष राखण्यात शिवसेनेला यश येईल अशी चर्चा असून, मंगळवारी उपनगराध्यक्षपदाची निवड प्रक्रिया पार पडणार आहे.

जुन्नर नगर परिषदेच्या नगराध्यक्षपदासाठी अपक्षांसह एकूण नऊ उमेदवार रिंगणात होते. यामध्ये शिवसेनेच्या सुजाता काजळे, राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्नेहल खोत, भाजपच्या ॲड. तृप्ती परदेशी, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या गौरी शेटे, काँग्रेसच्या राहीन कागदी यांसह अन्य अपक्ष महिला उमेदवारांनी निवडणूक लढवली. दरम्यान, निवडणूक निकालानंतर शिवसेनेच्या




सुजाता काजळे यांनी ५१४६ मते घेत राष्ट्रवादीच्या उमेदवाराचा अवघ्या २८२ मतांनी पराभव केला. तर या निवडणुकीत काँग्रेसच्या कागदी यांनी तब्बल ३८७६ मते घेतली. कागदी यांची मते निर्णायक ठरली व त्याचा फटका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवाराला बसल्याची जनतेमध्ये चर्चा आहे.

जुन्नरचे माजी आमदार अतुल बेनके यांनी निवडणूक काळात शहरात ठाण मांडून प्रचार यंत्रणा हातात घेतली होती. शहरातील बहुतांशी सर्वच प्रभागात राष्ट्रवादी काँग्रेसने काढलेल्या प्रचार रॅलीत बेनके हे सहभागी झाले झाले असल्याचे पाहावयास मिळाले.

आमदार शरद सोनवणे यांनी देखील शिवसेना पक्षाचे उमेदवारांबाबत उत्कृष्ट रणनीती ठरवून व प्रचार यंत्रणा राबवून शिवसेना पक्षाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवारासह ८ नगरसेवक निवडून आणण्याची महत्वपूर्ण कामगिरी बजावली.व काँग्रेस व एक अपक्ष नगरसेवक यांच्या मदतीने ११ नगरसेवकांचा शिवसेना व शिवजन्मभूमी विकास मंच नावाने स्वतंत्र गट स्थापन केला असुन, विक्रम परदेशी यांची गटनेता म्हणून निवड केली असुन, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने पुढाकार घेऊन एक अपक्ष व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नगरसेवकांच्या मदतीने जुन्नर शहर विकास आघाडी स्थापन करून ८ नगरसेवकांचा गट स्थापन केला आहे. वैष्णवी श्याम पांडे यांची गटनेता म्हणून निवड केली भाजपचे दोन्ही नगरसेवक तटस्थ आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष उपनगराध्यक्ष पदासाठी प्रयत्नशील असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसच्या एका पदाधिकाऱ्याने सांगितले. तर भाजपचे नगरसेवक अनिल रोकडे यांनी सांगितले की, "प्रत्यक्ष निवडीच्या प्रक्रियेदरम्यान परिस्थिती पाहून योग्य तो निर्णय घेतला जाईल." त्यामुळे जुन्नर नगर परिषदेचा उपनगराध्यक्ष कोण होणार? याची उत्कंठा जनरल शहरातील नागरिकांमध्ये असून, मंगळवारी याचे उत्तर मिळालेले असेल.

---

## सामाजिक अभियांत्रिकीमुळे समतावादी समाजाची निर्मिती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ओतूर :** भारतीय राज्यघटना ही केवळ कायद्यांचा संच नाही, तर समाजाच्या पुनर्रचनेचा आणि समतेकडे नेणाऱ्या प्रवासाचा जाहीरनामा आहे. भारतीय राज्यघटनेतील सामाजिक अभियांत्रिकीची संकल्पना समाजातील विषमता दूर करून न्याय्य, बंधुभावावर आधारित आणि समतावादी समाज निर्माण करण्याच्या उद्देशाने राबविण्यात आली आहे.

समाजातील विविध घटकांमध्ये समतोल साधण्यासाठी कायदे व धोरणांचा जाणीवपूर्वक वापर हा सामाजिक अभियांत्रिकीचा मूळ हेतू आहे. शिव छत्रपती महाविद्यालयाचे प्रा. डॉ. अभिजित पाटील यांनी ओतूर येथील अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालयात राष्ट्रीय युवक दिनानिमित्त आयोजित कार्यशाळेत यावर प्रकाश टाकला. त्यांनी सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्यघटनेची रचना करताना सामाजिक न्यायाला केंद्रस्थानी ठेवले आणि कायद्याला सामाजिक परिवर्तन साधण्याचे प्रभावी साधन बनवले.

कार्यशाळेचे दुसरे वक्ते डॉ. राजेंद्र आंबवणे म्हणाले, "भारतीय राज्यघटना बंधुता, समता आणि न्याय या मूल्यांवर आधारित समाज घडवण्याचा प्रयत्न करते. मात्र, सामाजिक अभियांत्रिकी ही फक्त राज्याची जबाबदारी नाही, तर नागरिक म्हणून आपल्यालाही संविधानिक मूल्यांचे पालन करणे अत्यंत आवश्यक आहे. कायदे असले तरी मानसिकता बदलली नाही तर सामाजिक परिवर्तन पूर्ण होऊ शकत नाही." कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रमेश शिरसाट होते. अध्यक्षीय मनोगतात त्यांनी सांगितले की, "भारतीय राज्यघटनेतील मूलभूत अधिकार हे सामाजिक अभियांत्रिकी साधण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. कलम १५ आणि १७ विशेषतः समाजातील विषमता नष्ट करण्यासाठी क्रांतिकारक आहेत. या अधिकारांमुळे दुर्बल, वंचित आणि उपेक्षित घटकांना समानतेसह सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळतो." उपप्राचार्य डॉ. कल्याण सोनावणे यांनी अध्यक्ष व प्रमुख वक्त्यांचे स्वागत केले. डॉ. नंदकिशोर उगले यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून रूपरेषा स्पष्ट केली. सूत्रसंचालन प्रा. सुवर्णा डुंबरे व डॉ. निलेश काळे यांनी केले, तर आभार डॉ. विनायक कुंडलिक यांनी मानले.

---

## चाकणमध्ये हिऱ्यांच्या दागिन्यांचा लखलखाट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चाकण :** येथील सुवर्ण पेढी 'वाफगांवकर राजलक्ष्मी ज्वेलर्स' आणि 'पवित्रम डायमंड ज्वेलरी' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या भव्य 'डायमंड ज्वेलरी लॉंचिंग' व प्रदर्शनाचा उद्घाटन सोहळा शनिवारी अत्यंत उत्साहात पार पडला. चाकण नगरपरिषदेच्या नवनिर्वाचित प्रथम लोकनियुक्त नगराध्यक्षा मनिषा गोरे यांच्या या प्रदर्शनाचे अधिकृत उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी चाकण नगरपरिषदेचे सर्व नवनिर्वाचित नगरसेवक आणि नगरसेविकांची प्रमुख उपस्थिती होती.

चाकण येथील नामांकित सुवर्ण पेढी 'वाफगांवकर राजलक्ष्मी ज्वेलर्स' आणि 'पवित्रम डायमंड ज्वेलरी' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या भव्य 'डायमंड ज्वेलरी लॉंचिंग' व प्रदर्शनाचा उद्घाटन सोहळ्यास चाकणच्या



नगराध्यक्षा मनीषाताई गोरे, नगरसेविका साधना गोरे, जयश्री नायकवाडी, रुपाली कांडगे, सुवर्णा राक्षे, आरती परदेशी, पुनम शेवकरी, स्वाती लेंडघर, ॲड. वर्षा शेवकरी, तृप्ती जगनाडे, अनिता घोगरे, विजया तोडकर, विजया जाधव, रेशमा मुटके यांचा समावेश होता. त्याचप्रमाणे नगरसेवक प्रकाश गोरे, रणजित जरे, अनिल लोहकरे, प्रेम जगताप, नितीन गोरे, हर्षद लेंडघर, सागर बनकर, आकाश जाधव, मंगेश कांडगे, प्रकाश भुजबळ, साहेबराव कड आणि धिरज मुटके या सर्व मान्यवरांनी उपस्थित राहून प्रदर्शनास शुभेच्छा दिल्या.

या महोत्सवाच्या निमित्ताने शोरूममध्ये हिऱ्यांच्या दागिन्यांचे नवीन आणि आकर्षक कलेक्शन अनावरण करण्यात आले आहे. हे भव्य प्रदर्शन १० जानेवारी ते १४ जानेवारी २०२६ या कालावधीत माणिक चौक, मेन रोड येथील दालनात सकाळी १० ते रात्री ८ या वेळेत ग्राहकांसाठी खुले राहणार आहे. पहिल्याच दिवशी नागरिकांनी या प्रदर्शनास भेट देऊन हिऱ्यांच्या दागिन्यांच्या विविध डिझाइन्सना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. 'सौंदर्याची नवी परिभाषा आणि शुद्धतेची ओळख' हे ब्रीदवाक्य घेऊन सुरू झालेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

---

## कोथिंबीरीचे बाजारभाव घसरले आंबेगावातील शेतकरी अडचणीत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्यात सध्या कोथिंबीरीचे बाजारभाव मोठ्या प्रमाणात घसरल्याने भाजीपाला उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. सध्या कोथिंबीरीच्या जुड्यांना केवळ शेकडा ७०० रुपयांपर्यंत बाजारभाव मिळत असून हा दर अत्यंत कमी असल्याने उत्पादन खर्चही निघत नसल्याची स्थिती निर्माण झाली आहे.

तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी कोथिंबीर लागवड मोठ्या प्रमाणात केली होती. मात्र यंदा हवामान अनुकूल राहिल्याने उत्पादन वाढले असून बाजारात आवकही प्रचंड वाढली आहे. स्थानिक उत्पादनासोबतच लातूर, नागपूर, बेंगळुरू, बेळगाव, नाशिक आदी भागांतील कोथिंबीर मोठ्या प्रमाणावर या परिसरातील बाजारपेठेत दाखल होत आहे. परिणामी मागणीच्या तुलनेत पुरवठा वाढल्याने दरांवर मोठा परिणाम झाला आहे.

कोथिंबीर पिकासाठी बियाणे, खते, औषध फवारणी, मजुरी, पाणी तसेच वाहतूक असा मोठा खर्च येतो. मात्र सध्याच्या घसरलेल्या बाजारभावात तो खर्चही वसूल होत नसल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. काही शेतकरी तोडणीचा खर्च परवडत नसल्याने शेतातच कोथिंबीर सोडून देण्याची वेळ येत असल्याचे चित्र दिसून येत आहे.



---

## ऊस तोडणीत हार्वेस्टरचा वापर वाढवा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**भवानीनगर :** साखर कारखान्यांच्या ऊस तोडणी मध्ये मजुरांच्या टंचाईवर मात करण्यासाठी साखर कारखानदारीत येणाऱ्या काळात यांत्रिक पद्धतीने हार्वेस्टरच्या माध्यमातून ऊस तोडणीचा प्रभावी कार्यक्रम राबवावा लागेल, असे मत साखर आयुक्त डॉ संजय कोलते यांनी व्यक्त केले.

डॉ कोलते म्हणाले, साखर कारखानदारीला अधिक कार्यक्षम बनवण्यासाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा (ए आय) वापर करून साखर कारखान्यात कोणत्या गोष्टी करता येतील ते लवकरच तपासले जाईल. २०३० पर्यंत मेकॅनिकल हार्वेस्टरकडे वळावे लागणार आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी उसाचे उत्पादन घेताना टिशू कल्चर बेण्याचा वापर करून व एआय तंत्रज्ञानाचा वापर करून उसाचे जास्तीत जास्त उत्पादन वाढवण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. साखर आयुक्त डॉ संजय कोलते यांनी शुक्रवारी भवानीनगर येथील श्री छत्रपती सहकारी साखर




कारखान्याला सदिच्छा भेट दिली. यावेळी कारखान्याचे अध्यक्ष पृथ्वीराज जाचक, जिल्हा बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिरुद्ध देसाई, कारखान्याचे उपाध्यक्ष कैलास गावडे, संचालक ॲड शरद जामदार, शिवाजी निंबाळकर रामचंद्र निंबाळकर, पृथ्वीराज घोलप, गणपतराव कदम, प्रशांत दराडे, अजित नरुटे, विठ्ठलराव शिंगाडे, अनिल काटे, बाळासाहेब कोळेकर, संतोष मासाळ, निलेश टिळेकर, सतिश देवकाते, अशोक पाटील, मंथन कांबळे, डॉ. योगेश पाटील, तानाजी शिंदे, माधुरी सागर राजपुरे, सुचिता सचिन सपकळ, कार्यकारी संचालक अशोक जाधव, जनरल मॅनेजर हनुमंत करवर आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन कामगार नेते युवराज रणवरे यांनी केले.

कारखान्याचे अध्यक्ष पृथ्वीराज जाचक म्हणाले, कारखान्यांना भेटी देणारे डॉ कोलते हे पहिलेच साखर आयुक्त आहेत. साखर आयुक्तांचे सर्वच कारखान्यांना विशेष सहकार्य असते. त्यांनी छत्रपती कारखान्यात सुरू असलेली काटकसर तसेच श्री छत्रपती कारखान्याने बावीस वर्षांपूर्वी हार्वेस्टरद्वारे उसाची तोडणी करणारा प्रयोग राज्यात सर्वात प्रथम राबवला होता, असे मत व्यक्त केले.

---

## धामणीच्या वेदमूर्ती मंदार क्षीरसागर यांना ऋग्वेद पुरस्कार प्रदान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था पुणेचे वतीने दिला जाणारा मानाचा ऋग्वेद पुरस्कार धामणी (ता. आंबेगांव) येथील पुरातन श्रीराम देवस्थानचे प्रमुख वेदमूर्ती मंदार मधुकर क्षीरसागर यांना राज्यसभेच्या खासदार मेधा कुलकर्णी आणि जेष्ठ पत्रकार राजकीय विश्लेषक भाऊ तोरसेकर यांच्या हस्ते देण्यात आला.

वेदमूर्ती मंदार क्षीरसागर यांचे ऋग्वेद सदशग्रंथ ऋग्वेदाचे अध्ययन झाले आहे. नुकतेच त्यांचे श्री सद्गुरु बाबा महाराज सहस्त्रबुद्धे समाधी मंदिर येथे संपूर्ण ५१ दिवस कंठस्थ ऋग्वेद घन पारायण संपन्न झाले. वेदवारिधी, वेदकलानिधी, ऋग्वेदनिधी इत्यादी पदव्या त्यांनी प्राप्त केल्या आहेत. देशस्थ ब्राह्मण संस्थेतर्फे कायम अशया वेदव्रतींचा सन्मान केला जातो. लोकमान्य सभागृह पुणे या ठिकाणी हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी खासदार मेधा कुलकर्णी, राजकीय विश्लेषक भाऊ तोरसेकर, सुशील कुलकर्णी, संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र कुलकर्णी, सुनील पारखी, सर्व विश्वस्त उपस्थित होते.

---

## ओतूरच्या चैतन्य विद्यालयाची शर्वरी आरोटे राज्यात ८१ वी

# शासकीय चित्रकला परीक्षेचा शंभर टक्के निकाल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ओतूर :** ग्राम विकास मंडळ ओतूर संचलित चैतन्य विद्यालय ओतूरचा एलिमेंटरी व इंटरमिजिएट या शासकीय चित्रकला परीक्षेचा निकाल शंभर टक्के लागला आहे.विद्यालयाची विद्यार्थिनी शर्वरी राजेंद्र आरोटे ही राज्य गुणवत्ता यादीत ८१ वी आली. या दोन्ही परीक्षेस विद्यालयातील १४७ विद्यार्थी बसले होते. त्यापैंकी अ श्रेणी २८ विद्यार्थ्यांना,ब श्रेणी ५१ विद्यार्थ्यांना व क श्रेणी ६८ विद्यार्थ्यांना प्राप्त झाली.अशी माहिती विद्यालयाच्या मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी दिली.

शासकीय चित्रकला परीक्षा महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ आणि कला संचलनालय महाराष्ट्र राज्य यांच्यामार्फत घेतली जाते. चैतन्य विद्यालय ओतूर मध्ये शासकीय चित्रकला परीक्षेचे केंद्र आहे.या परीक्षेला परिसरातील वीस माध्यमिक शाळांचे ६४३ विद्यार्थी बसले होते. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणे आणि त्यांना कलाक्षेत्रातील उच्च शिक्षणासाठी पात्र ठरविणे हा या परीक्षेचा उद्देश आहे. विद्यालयात दरवर्षी अनेक विद्यार्थी या परीक्षेत बसतात. त्यांच्या या यशामागचे कारण



सातत्यपूर्ण सराव,मेहनत व एकाग्रता आहे.या परीक्षेस अ, ब व क श्रेणी मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना अनुक्रमे दहावीच्या परीक्षेत सात , पाच व तीन असे वाढीव गुण मिळतात. अशी माहिती कलाविभाग प्रमुख संतोष सोनवणे यांनी दिली.

इंटरमिजिएट परीक्षेत अ श्रेणी प्राप्त विद्यार्थी: शर्वरी राजेंद्र आरोटे( राज्य गुणवत्ता यादीत ८१वी ), आदित्य संतोष फापाळे, अंजली योगेश खेत्री, अथर्व विठ्ठल कुटे, गार्गी राजेंद्र आरोटे, नंदिनी दीपक पाचपुते, नियती मनोज पटे, पलक रामदास डोंगरे, श्रुती बाळू नलावडे, वरद चंद्रशेखर नलावडे.

एलेमेंटरी परीक्षेत अ श्रेणी प्राप्त विद्यार्थी: आराध्य प्रभाकर दिघे, आराध्या मंगेश डुंबरे, आर्या जीवन गाढवे, तन्वी प्रशांत डुंबरे, तेजल कैलास देवकर, यश्मी योगेश हांडे, सुप्रभा बाळासाहेब साबळे, स्वराज तुकाराम गायकर, शुभदा सुहास बनकर, सोनाली जितेंद्र इसकांडे, सृष्टी महादेव तौर, समृद्धी उमेश डुंबरे, रसिका प्रमोद लांडगे, ज्ञानेश्वरी विजय मांडे, कार्तिक संजय गायकर, आर्या विक्रांत बनकर, भार्गव संतोष लोहके, दिव्या दत्तात्रय हाडवळे. या यशस्वी विद्यार्थ्यांना विद्यालयाचे कलाशिक्षक संतोष सोनवणे व बाळासाहेब साबळे यांनी मार्गदर्शन केले. यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचे ग्राम विकास मंडळ ओतूरचे अध्यक्ष अनिल तांबे,प्रभाकर तांबे, राजेंद्र डुंबरे, रघूनाथ तांबे, प्रदीप गाढवे, पंकज घोलप, रोहीदास घुले, मुख्याध्यापिका राजश्री भालेकर, संजय हिरे, अनिल उकिरडे, अजित डांगे यांनी अभिनंदन

## सारांश वृत्त

### सिद्धरामय्या आणि डीके यांच्याशी चर्चा

**बेंगळुरू :** कर्नाटकातील सत्ताधारी काँग्रेसमध्ये सुरू असलेल्या "सत्तेच्या संघर्षा" दरम्यान, मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि उपमुख्यमंत्री डीके शिवकुमार यांना जेव्हा गरज पडेल तेव्हा चर्चेसाठी नवी दिल्लीला बोलावले जाईल, असे एआयसीसी अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी सोमवारी सांगितले. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना चर्चेसाठी दिल्लीत कधी बोलावले जाईल या पत्रकारांच्या प्रश्नाला उत्तर देताना खरगे म्हणाले, "जेव्हा जेव्हा गरज पडेल तेव्हा पक्ष त्यांना बोलावेल." २० नोव्हेंबर रोजी काँग्रेस सरकारने पाच वर्षांचा कार्यकाळ अर्ध्यावर पूर्ण केल्यानंतर मुख्यमंत्री बदलाच्या संभाव्य अटकळांमध्ये सत्ताधारी पक्षातील नेतृत्वाचा संघर्ष तीव्र झाला आहे.

### कासरगोड येथे टोल वसुलीस विरोध

**कासरगोड (केरळ) :** येथील अरिकाडी येथील राष्ट्रीय महामार्ग-६६ वर टोल वसुली सुरू करण्यास विरोधकांनी विरोध केल्यामुळे वाहतूक रोखण्यात आली होती, असे पोलिसांनी सांगितले. मंजेश्वरचे आमदार एकेएम अशरफ यांच्या नेतृत्वाखाली ५०० हून अधिक निदर्शकांनी टोल वसुली मागे घेण्याची मागणी करत रस्त्यावर धरणे दिले. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी परिसरात ३०० हून अधिक पोलिस तैनात करण्यात आले आहेत.

### ग्रामीण रस्त्यांच्या रुंदीकरणासाठी ॲप-आधारित सर्वेक्षण

**पाटणा :** बिहार सरकारने सोमवारी सांगितले की राज्यातील ग्रामीण रस्त्यांच्या रुंदीकरणासाठी ॲप-आधारित सर्वेक्षण जानेवारीच्या अखेरीस पूर्ण केले जाईल. देखभालीचा कालावधी संपलेल्या किंवा देखभालीचा कालावधी संपणार असलेल्या सर्व ग्रामीण रस्त्यांसाठी ट्रान्झिट वॉक सर्वेक्षण करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे, असे एका निवेदनात म्हटले आहे. २०२६-२७ साठी, देखभाल कालावधी पूर्ण करणाऱ्या रस्त्यांची संख्या ५,८८७ असेल, असे यात नमूद करण्यात आले आहे.

## अमेरिका-भारत संबंधांना नवसंजीवनी मिळण्याची शक्यता

# अमेरिकी ट्रम्प यांची लवकरच भारत भेट?

दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प पुन्हा भारत भेट देऊ शकतात, असे संकेत भारतातील नव्याने नेमलेले अमेरिकेचे राजदूत सर्जियो गोर यांनी सोमवारी दिले. त्यांनी नवी दिल्लीमध्ये पदभार स्वीकारताना ट्रम्प आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यातील मैत्रीबाबत माहिती दिली तसेच व्हाईट हाऊसमधील काही मनोरंजक किस्सेही सांगितले.



राजदूत गोर म्हणाले की राष्ट्राध्यक्ष ट्रम्प त्यांच्या शेवटच्या भारत भेटीची आठवण कायम ठेवतात आणि येत्या एक-दोन वर्षात पुन्हा भारत भेट देण्याची योजना आहे. त्यांनी सांगितले, मी गेल्या आठवड्यात राष्ट्रपतींसोबत होतो. नवीन वर्षानंतर जेव्हा आम्ही भेटलो, तेव्हा त्यांनी येथे असलेल्या अनुभवाबद्दल आणि पंतप्रधान मोदी यांच्यासोबत असलेल्या मैत्रीबद्दल सांगितले. मला आशा आहे की राष्ट्राध्यक्ष लवकरच भारताला भेट देतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दोन्ही देशांमधील चालू व्यापार आणि शुल्कविषयक वादांबाबत बोलताना गोर म्हणाले, मी राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्यासोबत जगभर प्रवास केला आहे. मला पूर्ण आत्मविश्वास आहे की पंतप्रधान मोदींसोबत त्यांची मैत्री खरी आहे. खऱ्या मित्रांमध्ये मतभेद असू शकतात, परंतु शेवटी ते मतभेद मिटवले जातात, असे ते म्हणाले.

व्हाईट हाऊसमधील एका खास किस्स्याद्वारे त्यांनी ट्रम्प-मोदी यांच्यातील संबंध उलगडले. राजदूतांनी सांगितले की ट्रम्पना पहाटे २ वाजता फोन करण्याची सवय आहे, जी भारताच्या वेळेनुसार योग्य ठरते आणि या सवयीमुळे भारताशी असलेले त्यांचे संबंध अधिक मजबूत झाले आहेत. याशिवाय गोर यांनी एक महत्वाची घोषणा केली की अमेरिका भारताला पॅक्स सिलिका अलायन्समध्ये सामील होण्यासाठी आमंत्रित करेल.

हा अलायन्स अमेरिकेच्या नेतृत्वाखालील धोरणात्मक गट असून त्यामध्ये जपान, दक्षिण कोरिया, इस्रायल आणि तैवान यांचा समावेश आहे. सेमीकंडक्टर पुरवठा साखळी सुरक्षित करणे आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स तंत्रज्ञानात सहकार्य वाढवणे हे अलायन्सचे मुख्य उद्दिष्ट आहे.

ट्रम्प यांचे विश्वासू मानले जाणारे सर्जियो गोर म्हणाले, भारतापेक्षा महत्त्वाचा कोणताही भागीदार नाही. येत्या काही महिन्यांत आणि वर्षांत माझे ध्येय अमेरिका-भारत संबंधांना एक नवीन उंचीवर नेणे आहे. हे लक्षात घेण्यासारखे आहे की गोर यांनी पदभार स्वीकारला त्या वेळी अमेरिकेत "रशिया निर्बंध कायदा" सारख्या विषयांवर चर्चा सुरू होती, ज्याचा भारतासारख्या देशांवर परिणाम होऊ शकतो. तथापि, गोर यांच्या विधानांवरून स्पष्ट दिसते की ट्रम्प प्रशासन भारतासोबत धोरणात्मक भागीदारीस प्राधान्य देत असून, भारत-अमेरिकी व्यापार करार पूर्णत्वास नेण्याची अमेरिकेची इच्छाही आहे.

## जोरदार स्फोटाने हिमाचल प्रदेश हादरले

दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** हिमाचल प्रदेशातून धक्कादायक बातमी समोर आली आहे. सोलन जिल्ह्यातील नालागढ पोलीस स्टेशनच्या हद्दीत, स्टेशनच्या अगदी जवळील एका गल्लीमध्ये जोरदार स्फोट झाला. हा स्फोट इतका शक्तिशाली होता की त्याचा आवाज तब्बल ४०० ते ५०० मीटर अंतरापर्यंत ऐकू आला.

स्फोटाच्या तीव्रतेमुळे परिसरातील अनेक इमारतींच्या काचा फुटल्या असून, जवळ असलेल्या आर्मी हॉस्पिटललाही मोठा फटका बसला आहे. हॉस्पिटलच्या खिडक्या तुटून काचा रस्त्यावर पडल्याचे चित्र पाहायला मिळाले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही, तसेच मालमत्तेचेही गंभीर नुकसान टळले आहे.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पुरावे नष्ट होऊ नयेत यासाठी संपूर्ण परिसर सील करण्यात आला



असून नागरिकांना घटनास्थळी जाण्यास कडक मनाई करण्यात आली आहे. स्फोट नेमका कशामुळे झाला, तो अपघाती होता की घातपाताचा प्रकार, याबाबत अद्याप स्पष्टता नाही.

दरम्यान, एसपी बद्दी विनोद धीमान यांच्यासह फॉरेन्सिक पथक घटनास्थळी पोहोचले असून सखोल तपास सुरू आहे. स्फोटासाठी वापरण्यात आलेले साहित्य, वेळ आणि कारण याचा शोध घेण्याचे काम सुरू आहे.

वर्षाच्या सुरुवातीलाच घडलेल्या या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, खबरदारी म्हणून पोलिस बंदोबस्तात मोठी वाढ करण्यात आली आहे. या प्रकरणाचा तपास सुरू असून पुढील माहिती लवकरच समोर येईल.

## इस्रोच्या मोहिमेला मोठा धक्का

### पीएसएलव्ही मोहिमेच्या तिसऱ्या टप्प्यात तांत्रिक समस्या

दैनिक राज्य लोकतंत्र

**बेंगळुरू :** सोमवार, १२ जानेवारी रोजी पीएसएलव्ही-सी६२ मोहिमेला मोठा धक्का बसल्याने वैज्ञानिक समुदायाच्या पीएसएलव्हीच्या सुरळीत पुनरागमनाच्या आशा धुळीस मिळाल्या.

इस्रोचे अध्यक्ष व्ही. नारायणन म्हणाले: पीएसएलव्ही-सी६२ चे प्रक्षेपण वेळापत्रकानुसार झाले आणि तिसऱ्या टप्प्यातील वेगळे होईपर्यंत सर्वकाही नियोजित प्रमाणे झाले. तिसऱ्या टप्प्याच्या शेवटी काही अडथळे आढळून आले. उड्डाण मार्ग योजनेपासून दूर गेला. आम्ही डेटाचे विश्लेषण करत आहोत.

श्रीहरिकोट्टा येथील सतीश धवन अंतराळ केंद्राच्या पहिल्या लाँच पॅडवरून सकाळी १०:१८ वाजता हे प्रक्षेपण झाले. २०२६ मधील हे पहिले उपग्रह प्रक्षेपण होते, ज्याचे उद्दिष्ट पीएसएलव्हीवरील विश्वास पुनर्संचयित करणे होते, ज्याला बहुतेकदा संस्थेचा वर्कहॉर्स म्हणून संबोधले जाते. मे २०२५ मध्ये पीएसएलव्ही-सी६१ च्या अपयशानंतर हे प्रक्षेपण करण्यात आले, ज्यामध्ये चेंबर प्रेशरमधील बदलांमुळे तिसऱ्या टप्प्यात तांत्रिक बिघाड झाला. लाँचिंगपूर्वी, अध्यक्ष व्ही. नारायणन यांनी शनिवारी तिरुपती मंदिराला भेट दिली होती.

इस्रोचे पीएसएलव्ही-सी६२ हे पृथ्वी निरीक्षण उपग्रह आणि इतर १४ पेलोडसह प्रक्षेपित झाले. यात अन्वेषा नावाचा संरक्षण संशोधन आणि विकास संघटनेने विकसित केलेला एक प्रगत पृथ्वी निरीक्षण उपग्रह होता. हे पीएसएलव्हीचे ६४ वे उड्डाण आणि पीएसएलव्ही-डीएल प्रकाराचे पाचवे अभियान होते. या मोहिमेद्वारे इस्रोने त्यांचे १०१ वे कक्षीय प्रक्षेपण साजरे करण्याचे उद्दिष्ट ठेवले होते. या रॉकेटचे वजन २६० टन होते, त्याची उंची ४४.४ मीटर होती आणि ते ५०५.२९१ किमी उंचीवर पोहोचणार होते.

## उत्तर प्रदेशात धर्माच्या नावावर द्वेष; काँग्रेसची टीका

दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** मेरठमध्ये दलित महिलेच्या कथित हत्येनंतर काँग्रेसने सोमवारी उत्तर प्रदेशातील योगी आदित्यनाथ सरकारवर टीका केली. काँग्रेसच्या म्हणण्यानुसार, भाजपच्या सरकारच्या आश्रयाखाली जात व धर्माच्या आधारे द्वेषाला खतपाणी घातले जात असल्याचे दिसत आहे.

गुरुवारी सकाळी मेरठमधील एका गावात २२ वर्षीय पुरूषाने दलित महिलेची हत्या केली आणि तिच्या मुलीचे अपहरण केले, असा आरोप पोलिसांनी केला आहे. ही घटना परिसरात तणाव निर्माण करणारी ठरली, आणि प्रशासनाने अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात केला.

मृत महिलेची ओळख एका २० वर्षीय महिलेची आई म्हणून झाली आहे. सरधना परिसरातील कापसाड गावातून अपहरण केलेली २० वर्षीय महिला शनिवारी सहारनपूर जिल्ह्यात सुरक्षित सापडली, तसेच आरोपीला अटक करण्यात आली, असे पोलिसांनी सांगितले.

पत्रकार परिषदेत बोलताना काँग्रेसचे अनुसूचित जाती विभाग प्रमुख राजेंद्र पाल गौतम म्हणाले, "देशात जात आणि धर्माच्या आधारावर द्वेषाला खतपाणी घातले जात आहे आणि हे भाजप सरकारच्या आश्रयाखाली घडत आहे. मुख्यमंत्री योगीजी दलित, आदिवासी आणि मागासवर्गीयांना चिरडण्यासाठी उघडपणे संसाधनांचा वापर करत आहेत. जेव्हा राज्यात दलितांवर अत्याचार होतात, तेव्हा त्यांचा बुलडोझर हलत नाही."

गौतम म्हणाले, मेरठमध्ये एक मुलगी तिच्या आईसोबत जंगलाकडे जात होती. मुलीचे अपहरण करण्यात आले आणि आई तिला वाचवण्यासाठी आली तेव्हा तिची निर्घृण हत्या झाली. आम्ही पीडित कुटुंबाला भेटायला गेलो, परंतु आम्हाला थांबवण्यात आले. उत्तर प्रदेश पोलिस दोषींना शिक्षा देण्यासाठी तत्पर राहिले असते, तर असे गुन्हे टाळता येऊ शकले असते. आमचा असा विश्वास आहे की कायदा जात किंवा धर्म पाहून काम करू नये. जर तसे केले नाही, तर देश कमकुवत होईल. सरकारने २०२२ नंतर दलित अत्याचाराची आकडेवारी देखील सार्वजनिक केलेली नाही, हे पूर्ण अपयश आहे, असा आरोप त्यांनी केला.

गेल्या पाच वर्षांत देशात दलितांवरील अत्याचारांची सर्वाधिक घटना उत्तर प्रदेशात नोंदल्या गेल्या आहेत. धक्कादायक बाब म्हणजे २६ टक्के दलित अत्याचाराच्या घटना एकट्या उत्तर प्रदेशातच घडल्या आहेत, असा आरोप काँग्रेसने केला आहे.

## केंद्र सरकार आर्थिक भेदभाव करत आहे

दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** केरळचे मुख्यमंत्री पिनारायी विजयन यांनी सोमवारी तिरुअनंतपुरम येथे 'सत्याग्रह'चे नेतृत्व केले आणि भाजपच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारवर राज्याविरुद्ध गंभीर आर्थिक भेदभाव आणि संवैधानिक अधिकारांचे उल्लंघन केल्याचा आरोप केला. त्यांनी हा राज्य आणि त्याच्या लोकांच्या अस्तित्वाचा लढा असल्याचे म्हटले, ज्यामध्ये केंद्र जाणूनबुजून आर्थिक नाकेबंदी लादत आहे. शहीद स्मारकावर सुरू झालेला 'सत्याग्रह' संध्याकाळपर्यंत सुरू राहिला, ज्यामध्ये एलडीएफचे मंत्री, आमदार, खासदार, वरिष्ठ नेते आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते सहभागी झाले होते.

आकडेवारी सादर करताना मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले की चालू आर्थिक वर्षाच्या शेवटच्या तीन महिन्यांत (जानेवारी-मार्च) राज्याची कर्ज घेण्याची मर्यादा १२,००० कोटी होती, परंतु केंद्र सरकारने कोणतेही सक्तीचे कारण न देता ती ५,९०० कोटींनी कमी केली. यामुळे राज्याच्या आर्थिक वचनबद्धतेची पूर्तता करण्याच्या क्षमतेवर गंभीर परिणाम झाला आहे. शिवाय, केंद्राने विविध केंद्र प्रायोजित योजनांअंतर्गत ५,७८४ कोटींपेक्षा जास्त कर्ज घेतले आहे, आयजीएसटी वसुलीत ९६५ कोटी रोखले आहेत आणि हमी ठेवींवर आधारित ३,३०० कोटींसाठी कर्ज घेण्याची परवानगी नाकारली आहे. या आर्थिक वर्षासाठी एकूण कर्ज घेण्याची मर्यादा १७,००० कोटींनी कमी करण्यात आली आहे.

विजयन यांनी आरोप केला की केंद्र सरकार केरळचे संवैधानिक अधिकार हिरावून घेत आहे आणि संघराज्य रचनेचे उल्लंघन करत आहे. ते म्हणाले की ही एक अभूतपूर्व परिस्थिती आहे जिथे राज्याला त्यांच्या हक्कांपासून वंचित ठेवले जात आहे. लोकांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी एलडीएफ सरकारला रस्त्यावर उतरावे लागले.

### वादग्रस्त एसआयआर बद्दल आक्षेप; प्रक्रियेतील त्रुटींवर बोट

## ममता बॅनर्जींचे आयुक्तांना पत्र

दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी सोमवारी राज्यातील मतदार यादीच्या वादग्रस्त विशेष सघन सुधारणा (एसआयआर) बद्दल मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पाचवे पत्र लिहिले.

पत्रात, मुख्यमंत्र्यांनी या प्रक्रियेला "मूलभूतपणे दोषपूर्ण" म्हटले आणि दावा केला की २००२ च्या मतदार यादीचे एआय-चालित डिजिटायझेशन मोठ्या प्रमाणात डेटा विसंगती निर्माण करत होते आणि खऱ्या मतदारांना "तार्किक विसंगती" म्हणून चुकीचे वर्गीकरण करत होते.

गेल्या दोन दशकांपासून चालत आलेल्या स्वतःच्या वैधानिक प्रक्रियांकडे निवडणूक आयोग दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करून त्या म्हणाल्या की, "अर्ध-न्यायिक सुनावणी" नंतर पूर्वी केलेल्या सुधारणा असूनही मतदारांना त्यांची ओळख पुन्हा स्थापित करण्यास भाग पाडले जात आहे.

"दोन दशकांहून अधिक काळ चाललेल्या स्वतःच्या कृती आणि यंत्रणा नाकारणारा असा दृष्टिकोन मनमानी, अतार्किक आणि भारतीय संविधानाच्या अक्षर आणि आत्म्याच्या विरुद्ध आहे," असा आरोप त्यांनी केला. एसआयआर दरम्यान सादर केलेल्या कागदपत्रांसाठी योग्य पावती दिली जात नसल्याचा आरोपही बॅनर्जी यांनी केला, कारण ही प्रक्रिया "मूलभूतपणे सदोष" होती.

ममता यांनी म्हटले की एसआयआर सुनावणी प्रक्रिया "मोठ्या प्रमाणात यांत्रिक, पूर्णपणे तांत्रिक डेटाद्वारे चालविली गेली आहे" आणि "मन, संवेदनशीलता आणि मानवी स्पर्शाच्या वापरापासून पूर्णपणे वंचित" होती, असा दावा करून की ती "आपल्या लोकशाहीचा आणि संवैधानिक चौकटीचा पाया" कमकुवत करते.

ममतांनी त्यांच्या आधीच्या पत्रांमध्ये , सीईसीला राज्यातील एसआयआरला "अनियोजित, मनमानी आणि तात्पुरते" थांबवण्याची विनंती केली. त्यांनी बूथ लेव्हल ऑफिसर्स (बीएलओ) च्या आत्महत्यांसह अनेक मृत्यूंना देखील अधोरेखित केले, जे कथितपणे एसआयआर व्यायामाशी संबंधित कामाचा ताण, ताण आणि चिंता यामुळे झाले होते. १० जानेवारी रोजी लिहिलेल्या पत्रात ममतांनी आरोप केला की, एसआयआरबाबत निवडणूक आयोगाचे उद्दिष्ट "मतदार यादीत सुधारणा किंवा समावेश करणे नाही तर केवळ वगळणे आणि वगळणे हे दिसते. हे एका संवैधानिक अधिकार म्हणून काम करण्याची अपेक्षा असलेल्या संस्थेकडून राजकीय पक्षपात आणि हुकूमशाही उच्चाधिकाराचा त्रासदायक नमुना प्रतिबिंबित करते. निवडणूक आयोग अशा पातळीवर घसरला आहे जो समजणे कठीण आहे आणि कोणत्याही लोकशाही समाजासाठी गंभीरपणे चिंताजनक आहे, असे त्यांनी म्हटले आहे. यापूर्वी, ममतांनी एसआयआरला एआय टूल्सच्या मदतीने केलेला मोठा घोटाळा असे म्हटले होते. त्यांनी असा आरोपही केला की, राज्यात सुरू असलेल्या एसआयआरसाठी निवडणूक एजन्सी भाजपच्या आयटी सेलने विकसित केलेल्या मोबाइल ॲप्लिकेशन्सचा वापर करत आहे.

राज्यात एसआयआरच्या पहिल्या टप्प्यानंतर १६ डिसेंबर रोजी प्रकाशित झालेल्या प्रारूप यादीतून ५८ लाखांहून अधिक मतदारांची नावे वगळण्यात आली . एकूण ७.६ कोटी मतदारांपैकी, निवडणूक आयोगाने सुमारे १.६६ कोटी मतदारांच्या "खरेपणा" बद्दलही अटकळ बांधली आहे.

## मध्य प्रदेशात चिनी मांजाचा आणखी एक बळी

दैनिक राज्य लोकतंत्र

**भोपाळ :** मकर संक्रांतीच्या सणापूर्वी मध्य प्रदेशातील विविध जिल्ह्यांमध्ये चिनी मांजावरील बंदी आणि त्याच्या वापराविरोधात सुरू असलेल्या कारवाईला न जुमानता, त्याचा वापर सुरू असल्याने, इंदूरमध्ये एका मोटारसायकलस्वाराचा मृत्यू झाला.

इंदूरच्या टिळक नगर पोलिस स्टेशनमधील कर्मचाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, रघुबीर धाकड (४५) हा टाइल कंत्राटदार मोटारसायकलवरून घरी परतत असताना खजराना आणि बंगाली



चौकांमधील धारदार पतंगाच्या दोरीने अचानक त्याची मान अडकली आणि त्याचा गळा गंभीरपणे कापला गेला. तातडीने रुग्णालयात नेण्यात आले, जिथे उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. योग्य ती कारवाई केली जाईल, असे इंदूरमधील टिळक नगर पोलिस स्टेशनमधील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

गेल्या तीन महिन्यांत इंदूरमध्ये अशा प्रकारचा हा दुसरा मृत्यू आहे. ३० नोव्हेंबर रोजी, शहरात मोटारसायकल चालवणाऱ्या एका १६ वर्षीय मुलाचा धारदार पतंगाच्या दोरीने गळा कापल्याने मृत्यू झाल्याचे वृत्त आहे. छिंदवाडा जिल्ह्यात, रविवारी घराबाहेर खेळत असताना पतंगाच्या दोरीने अथर्व कराडे या नऊ वर्षांच्या मुलाच्या कानाला ४० हून अधिक टाके घालावे लागले. अल्पवयीन मुलाची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात येत आहे. महत्त्वाचे म्हणजे, स्थानिक प्रशासन आणि पोलिसांनी राज्यभरात बंदी असलेल्या चिनी मांजाच्या साठा करणाऱ्या, विक्रेते आणि वापरकर्त्यांविरुद्ध कारवाई सुरू केली आहे.

इंदूरमध्ये - जिथे ३० नोव्हेंबर २०२५ आणि ११ जानेवारी २०२६ रोजी दोन मृत्यू झाले होते - शहर पोलिसांनी गेल्या आठवड्यात शहराच्या वेगवेगळ्या भागातून ३ लाख रुपयांपेक्षा जास्त किमतीचे बंदी घातलेले चिनी मांज जप्त केले. लगतच्या उज्जैनमध्येही, बंदी घातलेल्या दोऱ्यांचा साठा करून विक्री करणाऱ्यांवर कारवाई सुरू करण्यात आली आहे.

### वैद्यकीय आणीबाणीमुळे विमान अन्यत्र वळवले

**नवी दिल्ली :** सोमवारी सकाळी राष्ट्रीय राजधानी ते विजयवाडा येथे जाणारे एअर इंडियाचे विमान वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितीमुळे जयपूरला वळवण्यात आले, अशी माहिती सूत्रांनी दिली. सूत्रांनी सांगितले की, एआय२५१७ या विमानात एका वृद्ध प्रवाशाची तब्येत बिघडली, त्यानंतर विमान जयपूरला वळवण्यात आले, जिथे त्याला विमानातून उतरवून रुग्णालयात नेण्यात आले. विमानातील प्रवाशांची संख्या किती होती याची माहिती मिळू शकली नाही.

## उत्तर भारत अजूनही गारठलेलेच; कडाक्यात वाढ

दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** उत्तर भारतात अजूनही कडाक्याची थंडी कायम आहे. राजस्थानच्या काही भागात तापमान शून्यापेक्षा खाली गेले असून, दिल्लीतील किमान तापमान यावर्षी पहिल्यांदाच २.९ अंश सेल्सिअस नोंदवले गेले आहे. भारतीय हवामान विभागाने म्हटले आहे की पुढील काही दिवस तीव्र थंडी सुरू राहण्याची शक्यता आहे. उत्तर भारतातील काही भागात तीव्र शीतलहरीची परिस्थिती निर्माण होऊ शकते. हिमाचल प्रदेश, जम्मू आणि काश्मीर आणि उत्तराखंडमधील काही ठिकाणीही शून्य अंश सेल्सिअसपेक्षा कमी तापमान नोंदवले गेले. पंजाब आणि हरियाणामध्ये तापमान गोठणबिंदूच्या आसपास राहिले.

स्थानिक हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, राजस्थानच्या काही भागात काही ठिकाणी थंडीपासून ते तीव्र थंडीची लाट नोंदली गेली आहे. दिल्लीत हंगामातील पहिली थंडी लाट अनुभवली गेली, काही ठिकाणी तापमान ३.० अंश सेल्सिअसपेक्षा कमी झाले. अयानगर हे शहरातील सर्वात थंड ठिकाण होते, येथे किमान तापमान २.९ अंश सेल्सिअस नोंदवले गेले. पालम स्टेशनवर १३ वर्षांतील सर्वात कमी किमान तापमान ३.० अंश सेल्सिअस नोंदवले गेले. पुढील दोन दिवसही अशीच परिस्थिती राहण्याची अपेक्षा आहे आणि या संदर्भात 'यलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे.

## सर्वोच्च न्यायालयात सुनावणी; केंद्रासह राज्य सरकारांना नोटिसा

# एससी-एसटी यांनाही क्रिमी लेअरचा लाभ मिळावा

दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** आरक्षणाबाबत देशात दीर्घकाळापासून वाद सुरू आहे. आरक्षण श्रेणीत येणाऱ्या परंतु आता सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम झालेल्यांना आरक्षणाचा लाभ नाकारला पाहिजे का, असाही वाद आहे. इतर मागासवर्गीयांसाठी आरक्षणात आधीच तरतूद आहे की "क्रिमी लेयर" (आर्थिकदृष्ट्या संपन्न) मध्ये येणाऱ्या कुटुंबांना आरक्षणाचा लाभ मिळणार नाही. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (एससी/एसटी) साठी आरक्षण मिळावे यासाठी ही मागणी आता करण्यात आली आहे. भाजप नेते आणि



ज्येष्ठ वकील अश्विनी उपाध्याय यांनी सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली, ज्यावर न्यायालयाने आज (सोमवार, १२ जानेवारी) सुनावणी केली आणि केंद्र सरकार आणि सर्व राज्य सरकारांना नोटिसा बजावल्या.

या याचिकेत एससी/एसटी आरक्षणासाठी "क्रीमी लेयर" प्रणाली लागू करण्याचा प्रयत्न केला आहे, जेणेकरून त्या श्रेणीतील सर्वात गरजूंना लाभ मिळतील याची खात्री केली जाईल. याचिकाकर्त्याचा असा युक्तिवाद आहे की सध्याच्या धोरणामुळे श्रीमंत एससी/एसटी समुदायांना फायदा होतो, तर गरीब कुटुंबांना वंचित राहावे लागते. याचिकाकर्त्या वकील अश्विनी उपाध्याय यांचा असा युक्तिवाद आहे की सरकारी किंवा संवैधानिक पदांवर असलेल्या एससी/एसटी कुटुंबांच्या मुलांना या श्रेणीअंतर्गत आरक्षणाचा लाभ मिळू नये.

याचिकाकर्त्याचा असा युक्तिवाद आहे की आरक्षणाचा उद्देश पीडित वर्गांना लाभ देणे हा होता, परंतु सध्याच्या व्यवस्थेत, तेच कुटुंबे पिढ्यानपिढ्या फायदे घेत आहेत, तर समाजातील उपेक्षित लोक नेहमीप्रमाणेच वंचित राहतात. सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने त्यांच्या याचिकेवर केंद्र आणि राज्य सरकारांना नोटीस बजावली आहे आणि या मुद्द्यावर त्यांचे उत्तर मागितले आहे. सरकारी किंवा संवैधानिक पदांवर असलेल्या कुटुंबांना अनुसूचित जाती/जमाती आरक्षणाचा लाभ देऊ नये अशी याचिकाकर्त्याची मागणी आहे.

त्यांच्या याचिकेच्या समर्थनार्थ युक्तिवाद करताना अश्विनी उपाध्याय म्हणाले की आरक्षण फक्त १० वर्षांसाठी सुरू करण्यात आले होते आणि प्रत्यक्षात ते गरीब, पीडित, शोषित, उपेक्षित, झोपडपट्टीवासीय किंवा आदिवासींच्या उन्नतीसाठी डिझाइन केलेले होते. ते म्हणाले की हे आरक्षण कधीही करोडपती किंवा बंगल्यात राहणाऱ्यांसाठी नव्हते. ते म्हणाले की जर तुम्ही संविधान सभेतील वादविवाद पाहिले तर तुम्हाला त्याचा अर्थ समजेल. एखादी व्यक्ती प्रथम एससी/एसटी आरक्षणाचा फायदा घेते आणि आयएएस अधिकारी बनते , नोकरीत काम करते, नंतर राजीनामा देते आणि एससी/एसटीसाठी राखीव जागेवरून खासदार/आमदार बनते आणि मंत्री देखील बनते यावर त्यांनी गंभीर प्रश्न उपस्थित केले.

ते म्हणाले की, आमदार, खासदार, मंत्री किंवा अनेक टर्म राष्ट्रपती म्हणून काम केलेल्यांची मुले देखील या आरक्षणाचा फायदा घेत आहेत. शिवाय, वरिष्ठ आयएएस अधिकारी, मुख्य सचिव आणि विभाग सचिवांची मुले देखील याचा फायदा घेत आहेत, जरी वास्तविकता अशी आहे की ते सर्व आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि मजबूत आहेत आणि त्यांनी त्याचा फायदा घेणे थांबवावे, कारण यामुळे सामाजिक दरी वाढेल.